छात्र प्रबोधन

सौर फाल्गुन, शके १९३६ । वर्ष १५ अंक ६
वार्षिक वर्गणी ₹ २००/ मूल्य ₹ २०

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी, कृतिशीलता जोपासणारे मासिक!



खळखळ धावत...

खळखळ धावत फेसाळत हा सागर उसळत येतो
मर्यादांना उल्लंघुनि नव आव्हाना घेतो ।। ध्रु. ।।

धवलगिरीच्या उंच उंच शिखरांचा बांध न ज्याला
प्रलयंकर मरुताची आहे साद जवाना तुजला ।। १ ।।

विक्रमगाथा इतिहासाच्या पानोपानि जयांची
त्या रणवीरा नमन करोनी धाव पुढे घ्यायची ।। २ ।।

आकर्षण गुरुतम धरतीचे सहज लीलया भेदी
विज्ञानाची गरुड भरारी तिच्यावरी तव कडी ।। ३ ।।

मर्यादांनी मर्यादुन? छे !! त्यांना उल्लंघुनी
पुढे पुढे चालणे असू दे हेच ध्येय तव मनी ।। ४ ।।

– विश्वनाथ गुर्जर



छात्र प्रबोधन

सौर फाल्गुन, शके १९३६। वर्ष १५ अंक ६

(मासिकाचा प्रारंभ : सौर श्रावण शके १९१४ (जुलै – ऑगस्ट १९९२) २७२ वा अंक, वर्ष २३ अंक ८

प्रकाशन दिनांक – सौर १० फाल्गुन, शके १९३६/1 मार्च २०१५

ॐ

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी
ने ज्योतिर्जगतात

• अंतरंग •

४.	**संवाद**	– महेन्द्र सेठिया
५.	कथा... **घे भरारी आकाशी**	– सुनंदा खानापूरकर
१०.	कविता... **लहानपण**	– सुदेश पगार
११.	प्रासंगिक... **अजरामर 'कॉमन मॅन'चा निर्माता आर. के. लक्ष्मण**	– सुप्रिया खोत
१४.	विज्ञान प्रयोग... **ज्वालामुखीची प्रतिकृती बनवा**	– डॉ. कांचनगंगा गंधे
१६.	कविता... **खिडकी**	– मृदुला पाठक
१७.	भटकंती... **अभयारण्य भटकंती एक अविस्मरणीय अनुभव**	– सुजाता लेले
२०.	प्रेरणादायी... **वेदनेतून फुलले गाणे**	– मृणालिनी चितळे
	खेळाच्या शाळेने मला घडवले	– सविता कोकाटे
२५.	लेखमाला... **समस्या परिहार** (लेखांक ७)	– मनीषा मिरजकर
२७.	कथा... **बगीचा**	– श. मा. पाटील
२९.	ललित... **माणसातला देव**	– सुनील शिनखेडे
३२.	मुलांचे पान.. **दुर्गा**	– कु. सई कामत
	कविता... **जमिनीची भूरूपे**	– कु. गायत्री सडेकर
	मुखपृष्ठाच्या आतील पानावरील पद्य... **खळखळ धावत**	– विश्वनाथ गुर्जर

याशिवाय – किस्से शास्त्रज्ञांचे (९), ज्ञान प्रबोधिनी आपल्या गावात, मन:पूर्वक अभिनंदन (१५), सुट्टीतील उपक्रम, शिबिरे –आवाहन (२६), प्रतिसादी वाचकवीर व्हा , (३४)

तळटिपेतील ओळी – 'जरूर पाहाव्यात' अशा वेगवेगळ्या क्षेत्रांतील वेबसाईट.

मुखपृष्ठाविषयी

चित्रात सावल्यांचा भाग शीतरंग व उन्हाचा भाग उष्ण रंगाने रंगवल्यामुळे चित्र परिणामकारक झाले आहे. ऊन–सावल्यांचा खेळ खूप वेगवेगळे आकार निर्माण करत असतो. आणि त्याचे चित्रकारांना आकर्षण असते. दारापुढील बोगनवेली आणि पक्ष्यांची जोडी यांमुळे चित्रात जिवंतपणा आला आहे. साध्या वाटणाऱ्या विषयाचे रूपांतर चांगल्या चित्रात कसे घडते, ते मुखपृष्ठ पाहून जाणवेल.

– राहुल देशपांडे

♦ संपादक, प्रकाशक, मुद्रक ♦
महेन्द्र सेठिया

♦ कार्यकारी संपादक ♦
शिल्पा कुलकर्णी

♦ संपादक मंडळ ♦
शैलजा देशमुख,
नीलिमा करमरकर
डॉ. कांचनगंगा गंधे,
आश्लेषा महाजन

♦ मुखपृष्ठ ♦
राहुल देशपांडे

♦ मुखपृष्ठाच्या आतील पानावरील चित्र ♦
तेजस्वी भुरके

♦ आतील चित्रे ♦
भरत केतकर

♦ संपर्क पत्ता ♦
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ, पुणे – 411030
☎ (०२०) २४२०७ १७४/१७९

संकेतस्थळ
www.chhatraprabodhan.org

ई–मेल
chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

मासिकाची वर्गणी
वार्षिक: ₹ २००, द्वैवार्षिक: ₹ ४००,
त्रैवार्षिक: ₹ ५५०,
दशवार्षिक: ₹ १,७००.

या अंकाची किंमत : ₹ २०
(पुण्याबाहेरील धनादेशासाठी - ₹ २० जादा,
घरपोच दिवाळी अंकासाठी
प्रतिवर्षी ₹ ४० जादा)

या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाकडून अनुदानापोटी काही र कम प्राप्त झाली आहे. परंतु या नियतकालिकात प्रसिद्ध झालेली मते महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळास मान्य असतील असे नाही.

छात्र प्रबोधन : निव्वळ मासिक नव्हे !... विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकसनाची चळवळ !!

। जरूर शोधा... http://tolweb.org (वनस्पतींच्या वर्ग, कुल जातीप्रमाणे वर्गीकरण) ।

प्रायोजक - श्री. चिंतामणी बने, डोंबिवली

संवाद

आपली आवड शोधू इच्छिणाऱ्या अन् प्रत्येक काम आवडीने करू इच्छिणाऱ्या प्रिय प्रबोधकांनो,

वार्षिक परीक्षा आता जवळ आल्या आहेत; तेव्हा सर्वजण जोरदार अभ्यासाला लागलेले असाल. अभ्यासाची वेगवेगळी कौशल्ये, तंत्रे, पद्धती वापरून कमीतकमी वेळात अधिक परिणामकारक अभ्यास करण्याचा प्रयत्न करा. तुमच्या प्रामाणिक अन डोळस प्रयत्नांच्या आधारे आत्मविश्वासानं परीक्षेला समोरे जा. स्वत: तर 'कॉपी' करू नकाच; पण तुमच्या वर्गाने/शाळेने मिळून कॉपी न करण्याचा संकल्प करा ! असा संकल्प करण्यासाठी तुम्ही पुढाकार घ्या. त्याच्या वातावरण निर्मितीसाठी वेगवेगळ्या क्षेत्रांतील मान्यवरांनी 'कॉपी विरोधी' दिलेले संदेश छात्र प्रबोधनच्या संकेत स्थळावर तुम्हाला मिळतील. वर्गामध्ये/शाळेमध्ये ते आवर्जून लावा. प्रार्थनेच्यावेळी वाचून दाखवा. त्यावर गटागटात चर्चा घडवून आणा. परीक्षेच्या वेळी वर्गात शिक्षक/पर्यवेक्षक असो वा नसो, 'आम्ही कॉपी करणार नाही' असं ठरवण्यासाठी अन त्याप्रमाणे आचरण करण्यासाठी सामूहिक प्रयत्न करा. निव्वळ 'तुम्ही एकटे सद्‌वर्तनी' असून पुरणार नाही. तुमच्या आसपासचे 'तुम्ही सगळे मिळून सद्‌वर्तनी' व्हायला हवे आहात. मग ते परीक्षेच्यावेळी 'कॉपी न करणं' असो वा सार्वजनिक ठिकाणची स्वच्छता, शिस्त पाळणं असो. प्रारंभ स्वत:पासून; पण तिथेच न थांबता अनेकांना त्यामध्ये सहभागी करून घेत पुढे जाणं हे व्हायला हवं. हे अवघड जरूर आहे; पण अश य निश्चितच नाही. त्यासाठी 'छात्र प्रबोधन' तुम्हाला सर्वतोपरी साहाय्य करेल. तुमच्या अडचणी, तुमचे अनुभव आम्हाला मोकळेपणाने आणि आवर्जून सांगा.

काही दिवसांपूर्वी विद्यार्थ्यांच्या गटासमोर 'अभ्यास कसा करावा' या विषयावर बोलायला गेलो होतो. मी विद्यार्थ्यांना प्रश्न विचारला, ''किती जणांना अभ्यास करायला आवडतो?'' आदर्श उत्तर देण्याच्या सरावानं ८०% विद्यार्थ्यांनी हात वर केला. पुढे विचारलं, ''तुम्हाला खरंच अभ्यास आवडतो, तर तुमच्यातले कितीजण सुट्टीमध्येही अभ्यास करतात?'' मग बहुतेकांचे हात खाली आले. एकतर अभ्यास करायचा, म्हणजे परीक्षेपुरताच ! आपले कुतूहल-जिज्ञासा शमवण्यासाठी अभ्यास करायचा असतो, तो स्वत:च्या स्वत: वाचून, प्रयोग करून, तज्ज्ञांशी चर्चा करून करता येतो, असं सांगितल्यावर; पुन्हा काही जणांचे हात वर झाले.

अभ्यास थोडासा बाजूला ठेवून मला तुम्हाला विचारायचंय, 'काय हो, तुम्हाला काय करायला आवडतं? म्हणजे आठ दिवस सुट्टी दिली अन् तुम्हाला हवं ते करण्याचं स्वातंत्र्य दिलं, सोयी-सुविधा-पैसे उपलब्ध करून दिले, तर तुम्हाला काय करायला आवडेल? त्यातल्या कशात तुम्ही तासनतास रमून जाल? काय केल्याने तुमचा उत्साह वाढेल? जे करायचं, ते अधिक उत्तम करण्याची इच्छा तुमच्या मनात निर्माण होईल? त्यासाठी स्वत:हून नवीन शिकण्याची धडपड तुम्ही कराल. त्यात अधिकाधिक कौशल्ये संपादन करण्यासाठी तुम्ही प्रयत्न कराल, नियमितपणे, स्वत:हून त्याचा सराव कराल? असं काही तुम्हाला सापडलंय का?' सापडलं असेल, तर ती तुमची आवड जोपासण्यासाठी मनापासून प्रयत्न करा, वेळ काढा, मार्गदर्शन मिळवा. जर अजून तसं काही सापडलं नसेल, तर यावर्षीची सुट्टी अन् पुढचे वर्षभर त्याचा शोध घेण्यासाठी जरूर वापरा. वेगवेगळ्या गोष्टी करून पाहा. करता करता त्यातलं काहीतरी तुम्हाला तुमच्या 'खऱ्या' आवडीचं सापडेल. अशी 'खरी आवड' सापडणं अन् ती जोपासण्यासाठी वेळ-श ती काढता येणं ही उत्साह अन् ऊर्जा निर्माण करणारी गोष्ट आहे, बरं का? अनेकांना वयाच्या पन्नाशी-साठीपर्यंत हे सापडत नाही. तुम्हाला हे शालेय वयातच सापडावं, यासाठी मनापासून शुभेच्छा !

याचबरोबर आपल्या वाट्याला आलेलं प्रत्येक काम आवडीनं करता यायला हवं हेही तितकंच महत्त्वाचं ! स्वामी विवेकानंदांनी बुद्धिमान व्य तीची व्याख्या करताना असं म्हटलं आहे की, 'जी व्य ती कोणत्याही कामाचे रूपांतर त्याच्या आवडीमध्ये करू शकते, ती खरी बुद्धिमान !' म्हणजेच आपल्याला करावं लागणारं कोणतंही काम नाईलाजानं, पर्याय नाही म्हणून, रडतखडत करण्यापेक्षा, त्या कामात रस घेत, आवड निर्माण करत, ते काम उत्तमरितीने पूर्णत्वाला न्यायला अधिक बुद्धिमत्ता लागते, असं स्वामीजींना म्हणायचंय !! तेव्हा आपली आवड शोधून त्यात प्रगती करण्याचा, त्यातून आनंद मिळवण्याचा प्रयत्न तर आपण प्रत्येकानं करायलाच हवा; पण त्याचबरोबर आपल्या बुद्धिमत्तेचा उपयोग करत आपल्या वाट्याला आलेलं प्रत्येक काम आवडीनं, आनंदानं, गुणवत्तेनं करण्याकरताही मनापासून प्रयत्न करायला हवा.

यावर्षीच्या गुढी पाडव्याच्या निमित्तानं आपण सगळे मिळून हा संकल्प करूया. तुम्हा सर्वांना येणारे 'मन्मथ' नावाचे नव संवत्सर उत्साहाचे, सर्वांगीण विकासाचे जावो यासाठी भरभरून शुभेच्छा! सुट्टीतल्या उपक्रमांमध्ये सहभागी होणार ना! (अंकात तपशील दिले आहेत.)

तुमचा दादा,

(महेन्द्र सेठिया)

अल्पजयाने कधि न सुटावा, मनबुद्धीचा तोल। ध्येय निरंतर राहो पुढती, सदा सर्वकाल।।

। जरूर शोधा... www.sciencebob.com (घरी करता येण्याजोगे सोपे प्रयोग) ।

प्रायोजक - डॉ. कीर्ती आपटे, पुणे - दात मजबूत राखण्यासाठी दातांची नियमित निगा राखा.

घे भरारी आकाशी...

– सुनंदा खानापूरकर

‘‘आजोबा, गोष्ट.’’

‘‘आज नको रे पिल्या. आज मी खूप दमलोय.’’

‘‘आजोबा, सांगा नं गोष्ट. तुमची गोष्ट ऐकल्याशिवाय मला झोप येत नाही,’’ स्वानंदानं आपलं डोकं आजोबांच्या मांडीवर घुसळलं.

त्याच्या पाठीवरून प्रेमभराने हात फिरवित आजोबा म्हणाले, ‘‘तू म्हणजे अस्सा आहेस नं पिल्या. आपला हट्ट पुरा करणार.’’

‘‘मला पिल्या पिल्या काय म्हणता हो... मी आता मोठा झालोय.’’ गाल फुगवून स्वानंद म्हणाला.

‘‘अरे हो ! माझ्या अगदी लक्षातच आलं नाही हं. आमचा स्वानंद आता मोठ्ठा झालाय. पण मोठ्या माणसाला गोष्ट कशाला सांगायची? तुझ्या बाबाला कुठे मी गोष्ट सांगतो?’’

‘‘अशानं तुमच्याशी कट्टी हं. मी काही बाबांच्या एवढा मोठा झालो नाही. बाबांसारखा कारखाना चालवीन, खूप पैसे मिळवून आणीन तेव्हा नका सांगू गोष्ट; पण तोपर्यंत रोज गोष्ट सांगायचीच.’’

‘‘ठीक आहे, ठीक आहे. कुठली बरं गोष्ट सांगायची?’’

‘‘राजा-राणीची अन् राजपुत्राची नको. वेगळी गोष्ट सांगा.’’

‘‘ऐक. एका गावाबाहेर खूप दाट झाडी होती. त्या गावातील लोक शहाणे होते. त्यांनी झाडे तोडली नाहीत. उलट आपल्या गावाच्या भोवती खूप झाडे लावली आणि वाढवली. त्यामुळे तो गाव नेहमी थंडगार असे. झाडे तोडू नये हे त्यांना कळत होते.’’

‘‘हो. आमच्या बाईपण आम्हाला वर्गात सांगतात, की झाडे तोडू नयेत. हत्या म्हणजे काय हो आजोबा?’’

‘‘हत्या म्हणजे जिवानिशी मारणे. ठार करणे. पण असं का विचारतोस?’’

‘‘आमच्या बाई म्हणतात, झाड तोडणं म्हणजे माणसाची हत्या करण्यासारखं आहे.’’

‘‘अगदी खरं आहे. झाडे आपल्याला सावली देतात, फळे-फुले देतात. झाडाचं लाकूड खूप उपयोगी असतं. झाडावर अनेक पक्षी राहतात. झाडांमुळे गारवा राहतो. प्रदूषण होत नाही. आणखीही खूप फायदे असतात झाडांचे.’’

‘‘बरं. आजोबा, गोष्ट.’’

‘‘त्या गावाबाहेरच्या झाडांवर खूप पक्ष्यांनी घरटी बांधली होती. त्या घरट्यांमध्ये त्यांची पिल्ले राहात. लहान पिल्लांची आई जवळपासच फिरून पिल्लांना भरवी. त्यांना उडायला शिकवी. पक्षी दूरवर उडत जाऊन आपल्या पिल्लांसाठी चारा घेऊन येत. संध्याकाळी सगळे पक्षी परत येत. त्यावेळी त्यांचा खूप किलबिलाट होई.

भव्य हिमालय तुमचा अमुचा, केवळ माझा सह्यकडा। गौरीशंकर उभ्या जगाचा, मनात पूजिन रायगडा।।

। जरूर शोधा... www.iucaa.ernet.in/nscipop (आयुकाचे खास विज्ञानप्रेमींसाठीचे संकेतस्थळ) ।

प्रायोजक - बडवे इंजिनियर्स, प्रा. लि., पुणे

त्याच झाडीमध्ये एक मोठ्ठं वडाचं झाड होतं. खूप जुनं. त्यावर शेकडो पक्षी राहत. त्यांची घरटी वडाच्या झाडाच्या फांद्याफांद्यांवर होती. वडाच्या झाडाला खूप फळं यायची. त्यामुळे पक्ष्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न सहजच सुटायचा.''

''आजोबा, पोटापाण्याचा काय प्रश्न असतो हो?''

''अरे, आपल्याला भूक लागली, की आपल्याला खायला काहीतरी हवे असते. खाल्ले की पोट भरते. खायला मिळणे म्हणजे पोटाचा प्रश्न. खाण्याबरोबरच आपण पाणीही पितो.''

''हं. हं. म्हणजे आई आपला पोटापाण्याचा प्रश्न सोडवते, नाही का ! पण आजोबा, तुम्ही आईला मदत करत असताच. भाजी चिरता, कोथिंबीर निवडता.''

''अरे, आईची किती धावपळ होते सर्व करताना. सगळ्यांचा स्वयंपाक करायचा. तुमचे तिघांचे डबे भरायचे. तिची स्वत:ची तयारी करायची. तुला शाळेत सोडायचे अन् मग ऑफिसला जायचे. अगदी अष्टभुजेसारखी कामं करीत असते. मी थोडी मदत करतो इतकेच.''

''हो. मी पण उद्यापासून मदत करीन आईला.''

स्वाती - स्वानंदची आई गोष्ट ऐकायला येऊन बसली होती. ती म्हणाली, ''सकाळच्या शाळेसाठी तीनतीनदा हलवून उठवावं लागतं महाराजांना, अन् म्हणे मी मदत करीन आईला.''

''असू दे गं. त्याला जमेल ते काम करील तो.'' आजोबांनी वाद जास्त वाढू दिला नाही. ''आता पुढे ऐक. त्या वडाच्या झाडावर खूप पक्ष्यांची घरटी होती. एका घरट्यातल्या पिल्लाला त्याची आई घरट्याबाहेर उडायला शिकवत होती; पण पिल्लू काही केल्या घरट्याबाहेर पडायला तयार नव्हते. आई त्याला ढकलायची, चोचीने टोचायची; पण पिल्लू घाबरून घरट्यातच दबून बसायचे. फारच घाबरट होते ते. बाकीच्या घरट्यातील पिल्ले फांदीवर येऊन उड्या मारायची. त्याला बोलवायची. पिल्लू घाबरत घाबरत घरट्याजवळच्या फांदीवर बसे की पुन्हा घरट्यात परत जाई. आई त्याला शिकवून, रागवून, टोचून दमली. पण पिल्लाची मजल फांदीच्या पलीकडे जात नव्हती. निराशेने ती पिल्लाच्या बाबाला म्हणाली, ''हा येथेच कुजत पडणार. हा काही बाहेर भरारी घेणार नाही. याचे मोठे बहीण-भाऊ केव्हाच गेले उडून. हाच कसा भित्रा राहिला देव जाणे.''

पिल्लाचे बाबा म्हणाले, ''अगं, अशी निराश होऊ नकोस. उद्या मी माझ्याबरोबर त्याला घेऊन जातो.''

दुसरे दिवशी पिल्लाचे बाबा बाहेर न जाता घरट्यातच थांबले. पिल्लाला मायेनं जवळ घेऊन म्हणाले, ''आज मी तुला बाहेर एक गंमत दाखवणार आहे. माझ्याबरोबर चल. घाबरू नकोस. मी तुझ्याबरोबर आहे. मी तुला मदत करतो.''

बाबांच्या बरोबर पिल्लू घरट्याबाहेर आले. बाबांनी त्याला थोडा वेळ तेथे बसू दिले. मग ते त्याला म्हणाले,

''आपण जरा वरच्या फांदीवर जाऊ. तेथून खूप छान गंमत दिसते.

स्थितप्रज्ञता काठी बळकट, त्यागवस्त्र त्यावरती। व्यक्तिमत्त्व तीच्या देशप्रीतिची बांधु गुढीला गाठी।।

। जरूर शोधा... www.letsfindout.com (अनेक विषयांवरील शास्त्रीय माहिती) ।

प्रायोजक - सौ. प्राची व श्री. शंतनू पटवर्धन, ह्यूस्टन, टेक्सास, अमेरिका

तू वर वर चढ. मी तुला खालून आधार देतो.''

पिल्लू बाबांच्या मदतीनं धीर धरून हळूहळू वर चढू लागले. बाबा त्याच्याशी सतत बोलत होते. पक्ष्यांच्या गोष्टी सांगत होते. पिल्लाची भीती बरीचशी कमी झाली. त्याला वर चढण्यात मजा वाटू लागली. हळूहळू ते दोघे बऱ्याच वरच्या फांदीवर आले.

''आता इथून बघ. बाहेर किती सुंदर दृश्य दिसते ! आपल्या घरट्यातून तर हे काहीच दिसत नाही. ती बघ नदी. पाणी कसं चमचम करतं ! पलीकडे ती धान्याने भरलेली हिरवीगार शेते. तिथे खूप दाणे खायला मिळतात. ताजे ताजे मऊ मऊ. ते स्वत: चोचीने काढून खाण्यात खूप मजा येते.''

पिल्लू ते बाहेरचे सुंदर जग पाहून हरखून गेले. बाबांना त्याने तशी कबुली दिली.

''अरे, याहून सुंदर जग आणखी पलीकडे आहे. जरा वरच्या फांदीवर गेलो तर तुला ते बघायला मिळेल. जायचे का वर की परत घरट्यात जायचे?''

''बाबा, आपण वर जाऊया. मला बघायचे आहे ते सुंदर जग.'' आता पिल्लाला भीती वाटत नव्हती.

''चल तर मग.''

दोघे वरच्या फांदीवर आले. ''ते बघ तिकडे दूर.'' बाबांनी दूर दिसत असलेला हिरवाकंच पट्टा दाखवला. ओहो ! किती सुंदर ! कितीतरी दूरपर्यंत हिरवा समुद्र पसरल्यासारखे वाटत होते. पिल्लानं समुद्र अद्याप पाहिला नव्हता. परंतु त्या हिरव्या समुद्रानं त्याच्या मनावर गारुड केलं.

''बाबा, आपण जायचे का तिकडे?'' पिल्लू बाबांच्याच मनातलं बोलले.

''बाळा, तिकडे आपले खूप पक्षीगण राहतात. तुझा दादा अन् ताईसुद्धा तिकडेच गेलेत. मीच त्यांना तिकडे जाण्याचा मार्ग सांगितला.''

''बाबा, ताईसुद्धा गेली? घाबरली नाही ती?''

''छट्! तुझी ताई धीट आहे. ती मुळीच कशाला घाबरत नाही.''

''मी सुद्धा घाबरणार नाही बाबा. मी पण तिकडे जाईन. तुम्ही याल नं बाबा माझ्याबरोबर?''

''नाही रे बाळा. आता आम्ही दमलो. इतका लांबचा प्रवास मला अन् तुझ्या आईला आता झेपणार नाही. आम्ही पूर्वी खूप दूर एका लहानशा झाडावर राहत होतो. तेथून या ठिकाणापर्यंत आलो. या झाडावर घरटे बांधले. तुम्हा तिघांचा जन्म इथे झाला. तुम्ही मोठे झालात. आता तुम्हीच अधिक चांगले ठिकाण शोधायला बाहेर पडायचे. आम्ही नाही येऊ शकत.''

''मला सांगाल बाबा कसे जायचे तिकडे? मी जाईन.''

''होय. तू न की जाऊ शकशील. आपल्या मनाचा प का निश्चय झाला, की आपण कोणतेही काम पार पाडू शकतो. इथून ते जंगल जवळ दिसत असले तरी खूप दूर आहे. प्रथम फांदीवर पाय घट्ट दाबून एकदम झेप घ्यायची अन् पंख पसरून हवेत तरंगायचे. पंख वरखाली हलवून पुन्हा पुढे झेपवायचे. सुरुवातीला हळूहळू जायचे आणि मग वेग वाढवायचा. दिवसभर असा आकाशमार्गाने प्रवास करायचा. भूक लागली तर एखाद्या झाडावर उतरून त्याची फळे किंवा शेंगा खायच्या. खाण्यासाठी जमिनीवर उतरायचे नाही. त्यात धोका असतो. तहान लागली तर चौफेर लक्ष ठेवून झऱ्याचे पाणी प्यायचे. दिवसभराच्या प्रवासानंतर रात्री एखाद्या झाडावर झोप घ्यायची. झाडावर बाकीचे पक्षी आहेत ना, झाडाच्या बुंध्याच्या ढोलीत साप नाही ना असे पाहून निर्धोक ठिकाणी मु काम करायचा. सकाळ झाली, की पुन्हा आपल्या वाटेने उडायचे. या प्रवासात सुद्धा सावध राहावे लागते. काही पक्षी 'पक्षीभक्षक' असतात. ते वरच्यावर पक्ष्यांची शिकार करतात. त्यांच्यापासून दूर पळायचे. तर काही पक्षी आपल्याला प्रवासात सोबत करतात. आपल्याशी बोलतात. असे शत्रू-मित्र सगळीकडेच असतात. त्यांना नीट पारखायला शिकायचे. अशा दूरच्या प्रवासात या गोष्टी अनुभवाने शिकायला मिळतात.''

पदोपदी पसरूनि निखारे आपुल्याच हाती। होऊनिया बेहोष धावलो ध्येयपथावरती।।

। जरूर शोधा... www.eco_tube.com (पर्यावरणासंबंधीचे व्हिडीओ शिकण्या व शिकवण्यासाठी) ।

प्रायोजक - डॉ. गीतांजली, डॉ. सिद्धार्थ पटवर्धन, ग्लास्गो, स्कॉटलंड

"पण बाबा, असे दूरवर उडताना मी पडलो अन् जखमी झालो, आजारी झालो तर तिथे कोण माझी काळजी घेणार? इथे आई माझी किती काळजी घेते !" आईच्या आठवणीने पिल्लाला भरून आले.

"होय बेटा. इथे काळजी घ्यायला आम्ही आहोत. परंतु त्या प्रवासात तुलाच तुझी काळजी घ्यावी लागेल. असे साहस करायचे तर कधीतरी पडझड होणारच. जो धडपडतो तोच पुढे जातो. अशावेळी एखाद्या झाडावर मु काम करायचा. जखमा भरून येईपर्यंत, पंखात पुन्हा बळ येईपर्यंत विश्रांती घ्यायची आणि नंतर पुढे जायचे. घाबरून अर्धवट मध्येच प्रयत्न सोडायचा नाही. तरच यश मिळतं."

"बाबा, मला हे सगळे जमेल? मला तर सगळे भित्रा भागुबाई म्हणून चिडवतात."

"न की जमेल तुला. तू ठरवलेस तर जमेल."

"पण बाबा, मी तिकडे पोहोचलो हे तुम्हाला कसे कळणार? दादा ताई पोहोचले हे कळले का तुम्हाला?"

"मी रोज सकाळी दूरवर जातो दाणे टिपायला. तुझ्यासाठी आई इथेच थांबते. मला तिकडे खूप पक्षी भेटतात. ते वेगवेगळ्या ठिकाणाहून आलेले असतात. त्यांच्याकडून मला कळले तुझे दादा आणि ताई तिकडे सुखरूपपणे गेले व पोहचले. तसेच तुझ्याबद्दलही मला कळत जाईल."

"दादा, ताई तिकडे भेटतील मला?"

"ते मात्र कठीण आहे. ते एवढे मोठे जंगल आहे की ते दोघे कोणत्या झाडावर राहतात हे कळणे अवघड आहे. तुला त्यांनी खूप लहान पाहिले आहे. तू तिकडे पोहचेपर्यंत बराच मोठा झाला असशील. ते तुला ओळखणारही नाहीत."

"मी तिकडे गेल्यावर इथे तुमच्याजवळ कोण? तुम्ही आणि आई इथे एकटेच राहणार. तुम्ही दोघे थकल्यावर म्हातारे झाल्यावर तुमची काळजी कोण घेईल बाबा?" हे बोलताना पिल्लाचे डोळे भरून आले.

पिल्लाचा मायाळूपणा पाहून बाबांचे मन सुपाएवढं झालं. त्यांनी मायेनं पिल्लाला आपल्या पंखात घेतलं. पंखानं त्याचे डोळे पुसले. आपले मन आवरून ते पिल्लाला म्हणाले, "बाळा, आमची काळजी करू नकोस. आम्ही येथे एकमेकांच्या सोबतीने राहू. तुम्ही तुमच्या उज्ज्वल भविष्याकडे नजर ठेवून पुढची वाटचाल करायची. आमच्यात गुंतून पडायचे नाही. कळले ना?"

"होय बाबा. मी हे साहस करायचा मनाशी प का निश्चय केला आहे. केव्हा निघू मी?"

"शाब्बास ! मला खात्री होतीच. यशस्वी होशील. आता संध्याकाळ झाली. आज विश्रांती घे. आईशी पोटभर गप्पा मार. उद्या सकाळी आपण दोघं येथेच येऊ. येथून तू भरारी घे."

दुसरे दिवशी सकाळी पिल्लू आईबाबांच्या बरोबर त्या उंच फांदीवर आले. त्याच्या डोळ्यात ते हिरवे स्वप्न चमचम करीत होते. आईपण आपल्या बाळाचे कौतुक बघायला आली होती. तिनं आपल्या पंखांनी त्याच्या डो यावर मायेनं थोपटून आशीर्वाद दिला.

एकच तारा समोर आणिक पायतळी अंगार, होता पायतळी अंगार। गर्जा जयजयकार क्रांतिचा गर्जा जयजयकार ।।

। जरूर शोधा... www.info_wedraj.com (आयुर्वेद शास्त्राविषयी जाणून घ्या) ।

प्रायोजक - कु. रेवती सारंग वऱ्हाडपांडे, पुणे

बाबांनी त्याच्या पाठीवरून प्रेमभराने पंख फिरवले. पिल्लाने एकवार आपल्या आईबाबांकडे पाहिले, दोन्ही पाय फांदीवर दाबून सर्व श तीनिशी बाहेर झेप घेतली अन् पंख पसरून आकाशात उडू लागले.

आई बाबांनी डोळे भरून ते दृश्य पाहिले. बाबा पुटपुटले, ''शुभास्ते पन्थान: ।''

आजोबा थांबले. स्वानंद पालथा पडून, अंथरुणावर दोन्ही हाताचे कोपरे ठेवून, गाल हातांच्या तळव्यात ठेवून विचार करीत होता. त्याच्या तंद्रीचा भंग करीत आजोबा म्हणाले, ''स्वानंद, आवडली का पिल्लाची गोष्ट?''

त्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करून स्वानंद म्हणाला,

''आजोबा, खरं खरं सांगा हं. मी मोठा होऊन एखादं मोठ्ठं काम करावं म्हणून तुम्ही ही पिल्लाची गोष्ट मला सांगितली, होय ना? ''

''व्वा ! हुशार आहे आमचा स्वानंद. बरोब्बर ओळखलेस हं. मग होणार नं तू मोठा. न भिता, न घाबरता पुढे जाणार नं जिद्दीनं?''

''होय आजोबा, मी पण त्या पिल्लासारखा प्रसंगी साहस करून पुढे जाईन. पण आजोबा, तुम्ही मला स्वानंद नका म्हणू. पूर्वीसारखं पिल्याच म्हणा.'' स्वानंदनं आजोबांच्या गळ्यात हात टाकले.

''होय रे माझ्या पिल्या. तू आमचं शहाणं पिलूच आहेस. होय की नाही गं स्वाती?''

आजोबा स्वातीकडे पाहून मिस्किलपणे हसले.

●●●

– सुनंदा खानापूरकर
'चिन्मय', ४५/२, सहजानंद सोसा.,
कोथरुड पुणे ४११०३८

किस्से शास्त्रज्ञांचे

वैज्ञानिकाचे दु:ख – फ्रान्सचा तो अत्यंत थोर असा रसायनशास्त्रज्ञ होता. आपल्या शोधांनी त्याने रसायनशास्त्राचे स्वरूपच बदलून टाकले. त्याखेरीज शेती, अर्थशास्त्र, सेवाकारण, समाजकारण, आरोग्य या सर्व क्षेत्रांत त्याने भरीव कामगिरी करून दाखविली होती. आणि तरीदेखील ८ मे १७९४ रोजी त्याला गिलोटीनच्या पात्याखाली उभे करण्यात आले होते. फ्रेंच राज्यक्रांतीच्या अंदाधुंदीच्या काळात दुर्दैवाची काळीकुट्ट नजर त्याच्यावर पडली होती. रसायनक्षेत्रात ज्याने प्रत्यक्ष वायू विच्छेदन केले त्याचेच स्वत:चे छेदन व्हायची वेळ आली. त्याला पकडण्यासाठी आलेल्या शिपायांना 'मी शास्त्रज्ञ आहे, माझा राजकारणाशी काही संबंध नाही', असं त्यानं सांगितलं.

'आम्हाला शास्त्रज्ञांची जरूरी नाही' असं त्याला ठणकावून सांगण्यात आलं. सूड बुद्धीने त्याच्यावर घाईगर्दीने खटला चालवून त्याला बळीचा बकरा करण्याची न्यायाधिशांची घाई चालली होती. शेवटी त्याचा शिरच्छेद करण्याची शिक्षा फर्माविण्यात आली.

'मी माझं आयुष्य सत्कारणी लावलं आहे. मी मरणाला तयार आहे. तू मुलांची काळजी घे,' असा निरोप त्यानं गिलोटीनच्या पात्याखाली उभे राहिल्यावर आपल्या पत्नीला धाडला. मग पाते क्षणार्धात खाली आले. त्या धारदार पात्याने या शास्त्रज्ञाचे शीर तत्काळ धडावेगळे केले. त्याच्या या क्रूर हत्येची वार्ता ऐकताच फ्रान्समधील प्रसिद्ध गणितज्ञ लॅग्रॉज म्हणाला, ''या थोर शास्त्रज्ञाचं डोकं उडविणाऱ्यास त्यासाठी एक क्षण जरी पुरला असला, तरी असं डोकं निर्माण करण्यास मात्र एक शतकदेखील पुरणार नाही.''

कोण होता हा दुर्दैवी शास्त्रज्ञ? **अन्तोन लॅव्हॉइज** हे त्या शास्त्रज्ञाचे नाव.

●●●

– श्री. रमेश सहस्रबुद्धे, सी–१०३, ऋतुरंग अपार्टमेंट, कोथरुड, पुणे 411038

बिकट वाट वहिवाट असावी, धोपट मार्गा धरू नको । मिळमिळीत बेचव जगण्याच्या, उपदेशांना स्मरू नको !

। जरूर शोधा... www.howstuffworks.com (प्रत्येक प्रश्नाचे उत्तर उपलब्ध) ।

प्रायोजक - सौ. प्राची अमर परांजपे, सांगली

लहानपण

आईचा हवाहवासा वाटणारा
तो स्पर्श,
बाबांनी दिलेले खेळणे पाहून
मनी होणारा हर्ष
आणि आठवते,
पायावर उभं राहण्याची कसरत..
कधीकाळी आईने मारलेला
'त्या' जागेवरील फटका
'अंगठा चोखतो' म्हणून दिलेला
हातावरील चटका...
बहिणीसमोर पिरगाळलेला
तो कान
'लहान आहे' म्हणून,
दिलेला तो मान
गर्दीत पकडलेला बाबांचा तो हात
फुंकर घालून थंड केलेला
तो मऊभात...
कळत नव्हते म्हणून
घडल्या अनेक चुका,
त्या सर्व विसरून
आईने घेतलेला तो मुका

'दुखत होतं' माझं म्हणून
न झोपलेले बाबा
तेव्हा नाही कळलं
तुमच्या जगण्याचा मीच होतो गाभा...
माझ्यासाठी बोबडे बोलणारी ती आई,
झोळीत टाकल्यावर म्हणायची अंगाई
बालवाडीतून मिळालेला तो गोड खाऊ
भरविलास मला दाखवून चिऊ-काऊ
आणि आठविते, किंकाळ्या ठोकल्या
तरी घातलेली ती अंघोळ...
खरंच, आई
तोच होता आयुष्याचा मेवा
म्हणूनच म्हणायचा तुका
'लहानपण देगा देवा'...
'माझा लाजा' म्हणून
मारलेली ती मिठी
वेचू किती त्या आठवणी
ओंजळही पडते थिटी.
त्या क्षणांपुढे पडते
सर्व जग फिके,
म्हणूनच की काय
शब्दसुद्धा झालेत मुके...

– **सुदेश पगार,** मु. गोळवाडी, पो. दहेगाव, ता. वैजापूर, जि. औरंगाबाद

अंधार हा लोपवा, दावा प्रकाश नवा। चराचर उजळवा, चैतन्याची ज्योत चेतवा।।

। जरूर शोधा... www.overtopsecrets.com (जगातील गुप्त घडामोडींची इत्यंभूत माहिती) ।

प्रायोजक - श्री. क्षेत्रपालेश्वर टुरिस्ट, पुणे, ☎ ०२०- २४४५०९७५

अजरामर 'कॉमन मॅन'चा निर्माता आर. के. लक्ष्मण !!

– सुप्रिया खोत

'पाहताक्षणी हसवतं ते हास्यचित्र, अन् हसवून विचार करायला लावतं ते व्यंगचित्र !' या व्यंगचित्रांच्या माध्यमातून,'कॉमन मॅन' च्या मदतीने गेली पाच दशके सामाजिक -राजकीय-सांस्कृतिक परिस्थितीवर मार्मिक भाष्य करणारे अवलिया आर. के. लक्ष्मण यांचे दि. २६ जानेवारी २०१५ रोजी निधन झाले. 'छात्र प्रबोधन'कडून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

मित्रांनो, 'तारें जमीं पर' चित्रपट आपल्यापैकी बऱ्याचजणांनी पाहिला असेल. हो ना? त्यातली शेवटची चित्रकला स्पर्धा आठवते का? स्पर्धेत लक्षात राहण्यासारखी होती ती सरांची काढलेली अर्कचित्रे अर्थात caricatures !

'अर्कचित्र' म्हणजे काय? तर एखाद्या व्य तीचं चित्र तिच्या चेहऱ्यावरील काही वैशिष्ट्यांना जास्त उठाव देऊन काढणं म्हणजे अर्कचित्र. तुम्ही हा प्रकार मराठी किंवा इंग्रजी वर्तमानपत्रामध्ये उजव्या/डाव्या कोपऱ्यात पाहात असाल. आणि 'व्यंगचित्र' म्हणजे अशा अर्कचित्रांना काही तिरकस राजकीय शेरे देऊन मांडणे. बऱ्याचदा अशा व्यंगचित्रांमध्ये राज्यकर्त्यांना उद्देशून आत्ताच्या परिस्थितीवर सूचक असा संदेश दिला जातो.

अशा या व्यंगचित्रांच्या दुनियेत गेली पाच दशकं रमलेला एक व्यंगचित्रकार म्हणजे आर. के. लक्ष्मण अर्थात रासिपुरम कृष्णास्वामी लक्ष्मण - यांचे २६ जानेवारी २०१५ रोजी वयाच्या ९४ व्या वर्षी निधन झाले. या लेखात आपण त्यांच्याबद्दल थोडं जाणून घेऊया.

लहानपणापासूनच लक्ष्मणना रेषांची चांगली जाण होती. बऱ्याचदा मोठेपणी आपल्या व्य तिमत्त्वात दिसणाऱ्या गुणांची मुळं ही आपल्या बालपणात असू शकतात. तसेच लक्ष्मणही जमिनी, भिंती, दारं इथे आपल्या रेषांची 'कलाकारी' दाखवू लागले. इतकंच नव्हे तर, लहानपणी खडूच्या साहाय्यानं त्यांनी आपल्याच वडिलांचं एक अर्कचित्रही काढलं होतं.

आर. के. लक्ष्मण यांनी नंतर चित्रकलेतच करिअर करायचं ठरवलं. याकरता प्रसिद्ध अशा *जे. जे. स्कूल ऑफ आर्टस्‌मध्ये* प्रवेशासाठी अर्ज केला. पण कॉलेजप्रमुखांनी त्यांच्या अर्जावर उत्तर देताना लिहिले,

''आमच्या संस्थेत विद्यार्थी म्हणून प्रवेशास पात्र ठरण्यासाठी आवश्यक अशी गुणवत्ता तुमच्याकडे नाही.''

अशातऱ्हेने त्यांना प्रवेश च क नाकारण्यात आला; पण विशेष गंमतीची गोष्ट अशी की, नंतर जेव्हा लक्ष्मण यांनी व्यंगचित्रकार म्हणून 'टाइम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्रामध्ये नाव कमावले; तेव्हा याच 'जे. जे. स्कूल'ने लक्ष्मण यांना एका कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बोलावलं होतं. तेव्हा भाषणात बोलताना लक्ष्मण म्हणाले,

''सर्वप्रथम मी अनेक वर्षांपूर्वी मला प्रवेश नाकारल्याबद्दल 'जे. जे. स्कूल'चे आभार मानतो; कारण त्यामुळेच मी चित्रकलेची मळलेली वाट सोडून व्यंगचित्रकार अशी वेगळी वाट धरू शकलो.''

वयाच्या एका टप्प्यावर एका प्रसिद्ध कॉलेजकडून प्रवेश नाकारला जाणं हे अपयशच, पण त्या अपयशाचं रूपांतर संधीत होऊ शकतं, ते असं !

लक्ष्मण यांनी चित्रकलेचे औपचारिक शिक्षण घेतलेले नव्हते. इ. स. १९४७ पासून 'टाइम्स ऑफ इंडिया' या वृत्तपत्रातली लक्ष्मण यांची 'पॉकेट कार्टून्स' जवळजवळ ५० वर्षे सुरू राहिली. लक्ष्मण यांच्या चित्रांतून डोकावणारा 'कॉमन मॅन' अर्थात 'सामान्य माणूस' म्हणजे आर. के. स्वतःच! हा ट कल असलेला, फुगीर नाकाचा, आखूड मिशावाला, चष्मेवाला, धोतर व चौकडीचा कोट असलेला 'कॉमन मॅन' तुमचं, आमचं, सामान्य नागरिकांचंच प्रतिनिधित्व करतो. म्हणूनच प्रत्येकाला तो हवाहवासा, आपल्यातला एक वाटतो. शिवाय, लक्ष्मण यांच्या 'कॉमन मॅन' ला चष्मा आहे. ज्यामुळे तो समाजातल्या प्रश्नांकडे (उदा. वाढती महागाई, राज्यकर्त्यांची नुसती पोकळ आश्वासने, पाणीप्रश्न इ.)

किती संकटे आली तरीही हिंमत धर, तू डरू नको। देवाच्या, दैवाच्या दारी, झोळी घेऊन फिरू नको।।

। जरूर शोधा... http://pbskids.org (वैज्ञानिक गोष्टींवर आधारित खेळ) ।

प्रायोजक - श्री. ऋषिकेश कुलकर्णी, पुणे

आपल्या अशा एका 'खास' दृष्टीने बघतो. त्याच्या चेहऱ्यावरही नेहमीच बावरलेले भाव दिसतात. समाजातल्या प्रश्नांमुळे त्रस्त झालेले आपणही वास्तवात असेच भांबावून जातो ना !

अशा या 'कॉमन मॅन' ला ५० वर्षे पूर्ण झाल्यावर पुणे येथील सिम्बायोसिस संस्थेमध्ये 'कॉमन मॅन'चा पुतळा उभारण्यात आला. तत्कालीन राष्ट्रपती के. आर. नारायण यांच्या हस्ते 'कॉमन मॅन' देशाला अर्पण करण्यात आला.

'टाइम्स'च्या एकशे पन्नासाव्या वर्धापनदिनानिमित्त लक्ष्मण यांच्या निवडक व्यंगचित्रांचा संग्रह 'द इलो वंट ब्रश' माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. समारंभानंतर गप्पा मारताना राजीव गांधी लक्ष्मणना म्हणाले, ''मला तुमची व्यंगचित्रं आवडतात, पण तुम्ही मला त्यात फारच लठ्ठ दाखवता बुवा !'' त्यावर लक्ष्मण चटकन उत्तरले, ''मी त्यात लक्ष घालीन!''

राजीव गांधींकडे कोणताही प्रश्न नेला की, 'मी त्यात लक्ष घालीन!' असं उत्तर ते नेहमी द्यायचे. लक्ष्मण यांनी राजीव गांधींना त्यांच्याच शब्दांत उत्तर दिले; तेव्हा उपस्थितांमध्ये एकच हशा पिकला.

व्यंगचित्रे काढण्यासाठी आवश्यक अशी सूक्ष्म निरीक्षणश ती, रंगरेषांवर प्रभुत्व यांसोबतच एक तल्लख, सजग व हजरजबाबी बुद्धिमत्ता लक्ष्मण यांच्याकडे होती.

आर. के. लक्ष्मण यांची अनेक व्यंगचित्रे प्रसिद्ध आहेत; पण एक चित्र असं आहे की त्यात भारतानं चंद्रावर मानव पाठवण्याचा प्रकल्प आखला आहे. अंतराळ केंद्रात शास्त्रज्ञ त्याविषयीच्या कामात गढले आहेत. दरवाजात 'कॉमन मॅन' उभा आहे व एक शास्त्रज्ञ म्हणतात, ''हा पाहा आपला माणूस; अन्न, पाणी, निवारा, हवा, वीज याशिवाय तो जिवंत राहू शकतो !'' आर. के. लक्ष्मण यांचे विनोद हे असे जगण्यातली विसंगती स्पष्ट करणारे, पण कोणाला न दुखवता हलकीफुलकी कोपरखळी मारणारे असत.

ह्या 'कॉमन मॅन'चे वैशिष्ट्य म्हणजे लक्ष्मण यांनी त्याला कधी हसताना दाखवले नाही; पण लक्ष्मण यांच्या आत्मचरित्रात, पहिल्याच व्यंगचित्रात 'कॉमन मॅन'च लक्ष्मण यांचं व्यंगचित्र काढताना दाखवला आहे आणि कॉमन मॅनच्या चेहऱ्यावर स्मित उमटलेलं आहे!

●●●

– सुप्रिया खोत
जी ७/१०३, गंगाधाम फेज २,
बिबवेवाडी कोंढवा रस्ता, पुणे 411037

गमतीची रेषा

(सौर कार्तिक शके १९३१/नोव्हेंबर २००९ च्या छात्र प्रबोधन दिवाळी अंकात मधुकर धर्मापुरीकर यांनी गमतीची रेषा हा व्यंगचित्रकाराची शैली आणि त्यांच्या काही चित्रांचा परिचय करून देणारा रसास्वादपर लेख लिहिला होता. सादर करतोय त्यातील काही संकलित भाग.)

जागतिक कीर्तीचे व्यंगचित्रकार आर. के. लक्ष्मण यांच्या लहानपणचा एक किस्सा आहे. लक्ष्मण तेव्हा आठ–दहा वर्षांचे असतील. घरी मासिकं भरपूर यायची आणि लक्ष्मण यांना वाचायच्या आवडीपेक्षा एक मजेदार अशी खोडच होती. त्यांच्या हातात पेन्सिल असायची अन् मासिकात कुणाचंही चित्र/फोटो दिसला रे दिसला

तुमच्या अमुच्या गंगा यमुना, केवळ माझी भिवरथडी। प्यार मला हे कभिन्न कातळ, प्यार मला छाती निधडी।।
। जरूर शोधा... http://www.societyofrobots.com (रोबोट तयार करायला शिका) ।
प्रायोजक - चि. अखिलेश संतोष काकडे, पुणे

१.

२.

की, लक्ष्मण त्या चित्रावर काम-करायचे. म्हणजे, हातातल्या पेन्सिलीने चित्रातल्या बाईला मिशा काढ; तर कुणाला टोपी, कुणाला चष्मा, दाढी काढ असं त्यांचं चालायचं. त्यात ते कमालीचे तल्लीन होऊन जायचे. एकदा त्यांच्या वडिलांचे स्नेही घरी आले होते. बैठकीत बसून मासिक/पेपर वाचत होते. लहानसा लक्ष्मण त्यांच्यासमोरच बसला होता. अन् नेहमीप्रमाणे पेन्सिल घेऊन त्याच्या खोड्या चालू होत्या. एका मासिकात एका शेळीचं चित्र होतं; आणि अनाहूतपणे लक्ष्मण यांनी त्या शेळीला चष्मा काढला. (चित्र १) ते मासिक बाजूला सारून त्यानं दुसरं घेतलं. पाहू लागला.

इकडे समोर बसलेले त्याच्या वडिलांचे स्नेही अचानक लक्ष्मणवर ओरडले, 'माझी अशी थट्टा करतोस का?' हातातलं मासिक टाकून ते निघूनसुद्धा गेले. लक्ष्मण यांना कळलंच नाही, काय झालं ते. त्यांचा आवाज ऐकून बाहेर आलेल्या लक्ष्मणच्या मोठ्या भावाने ते मासिक उचलून पाहिले. अन् त्या गृहस्थाच्या रागाचे कारण लक्ष्मण यांना कळले. कारण रागावून गेलेल्या त्या गृहस्थाच्या चेहऱ्यात आणि चष्मा लावलेल्या त्या शेळीच्या चेहऱ्यात विलक्षण साम्य होते ! (चित्र २) लक्ष्मण यांनी अनाहूतपणे हा उपद्व्याप केला होता; पण त्यातून त्यांना एक महत्त्वाचा धडा मिळाला. माणसांच्या चेहऱ्यात अन् जनावरांच्या चेहऱ्यात कधीकधी विलक्षण साम्य असतं. इतकंच काय, निर्जीव वस्तूंनाही चेहरे असतात. आवश्यकता असते, ती फ त आपल्या नजरेची. त्या नजरेनं पाहिलं, तर आपल्या आसपास अनेक गोष्टींत अनेक गमती विखुरलेल्या दिसतील आपल्याला !

याच गमती - जमती जेव्हा रेषेच्या साहाय्याने चित्रित केल्या जातात, तेव्हा त्याची हास्यचित्रे तयार होतात. पाहताक्षणी हसविणाऱ्या या चित्रांची अधिक मजा घ्यायची असेल, तर आपण चित्रापाशी थांबायला पाहिजे. चित्राची रेषा, त्यातले दृश्य, त्यातला विनोद यांच्या संगतीत आपण रेंगाळलो की, हास्यचित्राचा आस्वाद अधिक चांगल्या तऱ्हेने आपल्याला घेता येतो. हास्यचित्रकाराचा खोडकरपणा जसजसा आपल्याला सापडत जातो, तसं तसं त्याचं ते चित्र आपल्या मनात घर करीत जातं. हसवतं ते हास्यचित्र; अन् हसवून विचार करायला लावतं ते व्यंगचित्र!

●●●

जरूर वाचा – आर. के. लक्ष्मण यांचे आत्मचरित्र **'The tunnel of time'** किंवा मराठी अनुवाद – **'लक्ष्मणरेषा'**

मधुगुंजन लखलाभ तुम्हाला, बोल रांगडा प्यार मला। ख्रिस्त, बुद्ध विश्वाचे शास्ते, तुकयाचा आधार मला।।

। जरूर शोधा... http://www.metric.conversions.org (विविध मोजमापे आणि त्यांच्यातील रूपांतरे शिकण्यासाठी) ।

प्रायोजक - सौ. नंदिता सदाशिव वझे, पुणे

विज्ञान प्रयोग

ज्वालामुखीची प्रतिकृती बनवा

साहित्य : बेकिंग सोडा (खाण्याचा सोडा), व्हिनेगार, पाणी, लहान तोंडाची प्लॅस्टीक बाटली, साधी माती, चिकण माती किंवा खेळण्याच्या दुकानात मिळणारा ‘ ले’, खाण्याचे रंग (तांबडा, नारिंगी, पिवळा), खरकागद (ऐच्छिक), लि वीड डिटर्जंट.

प्रयोगासाठी लागणारा वेळ – ३० ते ४० मिनिटे

कृती : चिकणमाती किंवा ले किंवा माती ओली करून प्रथम शंकूचा आकार तयार करून घ्या. हा शंकू आतून पोकळ ठेवा. त्यात बाटली ठेवा किंवा बाटलीच्या भोवती मातीचा शंकूचा आकार बनवा. हा आकार तयार करताना बाटलीला बूच लावा. बाटलीचं तोंड शंकूच्या तोंडापाशी येईल असे बघा. मातीला बाहेरून खरकागद (किंवा कोणताही पातळ खडबडीत कागद) लावा. बाटलीचं बूच काढून त्यात कोमट पाणी आणि खाण्याचे रंग (प्रत्येकी अर्धा ते एक चमचा) टाका. नंतर त्यात ८ ते १० थेंब *लिक्वीड डिटर्जंट* टाका. त्यात तीन ते चार चमचे बेकिंग सोडा टाकून त्यावर हळूहळू व्हिनेगार ओता. थोड्याच वेळात ज्वालामुखी ‘जागा’ झालेला दिसेल. त्यातून तांबडा, नारिंगी, पिवळ्या रंगाचा ‘लाव्हारस’ (?) बाहेर येईल.

न की काय होतं?

बेकिंग सोडा आणि व्हिनेगार (अल्कली आणि आम्ल) यांच्यात रासायनिक क्रिया घडते. (फेब्रुवारीच्या छात्र प्रबोधनच्या अंकातील पान १६ पहा). कार्बन डाय ऑ साईड वायू तयार होतो. (खऱ्या ज्वालामुखीत सुद्धा हा वायू तयार होतो.) लि वीड डिटर्जंटच्या थेंबांना या वायूचे बुडबुडे चिकटतात. बाटलीत खूप दाब वाढतो, त्यामुळे वायूचे बुडबुडे लि वीड डिटर्जंटच्या थेंबांबरोबर आतल्या रंगीत पाण्यासह बाहेर येतात आणि ‘लाव्हारस’ (?) बाहेर पडल्यासारखा दिसतो. कोमट पाणी रासायनिक क्रिया लवकर घडवून आणते.

कोणती निरीक्षणं नोंदवाल :

१. व्हिनेगार टाकल्यानंतर किती वेळाने लाव्हारस बाहेर पडतो?
२. चिकणमाती, साधी माती किंवा ले यांच्यापैकी कशावर जास्त वेळ लाव्हारस (?) टिकून राहतो.
३. सोडा, व्हिनेगार यांचे प्रमाण किती घेतले तर रासायनिक क्रिया वेगाने घडते.
४. ‘ज्वालामुखीतून’ किती वेळ ‘लाव्हारस’ बाहेर पडत राहतो? त्याचा रंग बदलतो का? बदलत असल्यास तो कोणता व किती वेळ टिकतो?

अजून काय कराल?

१. मातीच्या ऐवजी ६ कप कोणत्याही धान्याचे पीठ (म याचे वापरल्यास जास्त चांगले – का? ते शोधून काढा), २ कप मीठ, ४ चमचे खाण्याचे तेल आणि २ कप पाणी घेऊन ते एकत्र कालवा आणि त्या मिश्रणानी ज्वालामुखीची प्रतिकृती बनवा.
२. बाटलीत व्हिनेगार अगोदर घाला नंतर बेकिंग सोड्याचा द्राव बनवून त्यात टाका. द्राव हळूहळू टाकून पाहा किंवा निरीक्षण नोंदवा. काय होतं पाहा.
३. कोमट पाणी, सोडा, खाण्याचा रंग एकत्र बाटलीत ओता. काडीने हलवा, नंतर डिटर्जंट व शेवटी व्हिनेगार टाका. काडीने थोडा वेळ हलवले किंवा जास्त वेळ हलवले तर लाव्हारस (?) तित याच जोरकसपणे बाहेर येईल का? निरीक्षण नोंदवा. त्यामागील कारण शोधा.
४. कोमट पाणी, खाण्याचे रंग, सोडा बाटलीत घालून जोरात हलवा आणि नंतर त्यात व्हिनेगार टाका. (लगेच लांब जाऊन उभे रहा.)
५. ज्वालामुखीची प्रतिकृती न करता फ त प्लॅस्टीक

कळे मला काळाचे पाऊल, द्रुतवेगाने पुढति पडे। कळे मला क्षितिजाचे वर्तुळ, क्षणोक्षणी अधिकचि उघडे।।

। जरूर शोधा... http://rubiks.org (रूबीकच्या घनाचे दृकश्राव्य किस्से)।

प्रायोजक - श्री. राहुल भिडे, पुणे

बाटली घ्या ती व्हिनेगारने भरा. *फिल्टर* पेपरवर किंवा *टिश्यू पेपरवर* खायचा सोडा ठेवून तो *पेपर* सर्व बाजूने बंद करा व त्याची उभी घडी करा किंवा काबुली चण्याला वापरतात तसा 'कोन' करा. बाटलीत हा कागद हळू आणि वरचेवर ठेवा. हाताने बाटलीवर बूच ठेवून द्या. थोड्या वेळाने काय होते ते पाहा.

कोणकोणती माहिती मिळवाल?

१. ज्वालामुखी म्हणजे काय? त्याचे प्रकार कोणते?
२. लाव्हारसात कोणकोणते घटक आणि वायू असतात?
३. सर्वात मोठा ज्वालामुखी कोठे आहे?
४. कोणत्या देशात जास्त ज्वालामुखी आहेत?

●●●

– **डॉ. कांचनगंगा गंधे,** ४१/६६७ लोकमान्यनगर, पुणे ३०

ज्ञान प्रबोधिनी आपल्या गावात

आपल्या गावातील शाळांमध्ये प्रबोधन तासिका आपल्या भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रबोधक मंडळ सुरू करण्यासाठी छात्र प्रबोधनतर्फे 'संयोजक प्रशिक्षण शिबिर' आयोजित करण्यात येत आहे. शिबिराचा तपशील पुढील प्रमाणे

✻ छात्र प्रबोधन संयोजक प्रशिक्षण शिबिर ✻

दिनांक : **रविवार, दि. १२ एप्रिल ते मंगळवार, १४ एप्रिल २०१५**
वेळ : सकाळी ८.०० ते रात्री ८.०० (पुण्याबाहेरील सदस्यांसाठी निवासाची सोय)
स्थळ : ज्ञान प्रबोधिनी, पुणे
शुल्क : **₹ ६००/– प्रत्येकी** (न्याहारी, भोजन, निवास व्यवस्थेसह)
अनिवासी व्य तींसाठी **₹ ५००/– प्रत्येकी**

शिबिरासाठी शुल्कासहित अंतिम नावनोंदणी
सोमवार ६ एप्रिल पर्यंत **छात्र प्रबोधन** कार्यालयात करावी.

संपर्क : सौ. सुलभा कुलकर्णी – ९६०४१२९४४५ सौ. सुनीता गायकवाड – ९४२१०२६०९३

✻ मन:पूर्वक अभिनंदन ! ✻

भारतीय साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या ज्ञानपीठ पुरस्कारासाठी मराठी साहित्यातील योगदानाबद्दल **भालचंद्र नेमाडे** यांची निवड केली गेली. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त होणारे नेमाडे हे वि. स. खांडेकर, कुसुमाग्रज आणि विंदा करंदीकर यांच्या नंतरचे चौथे मराठी साहित्यिक आहेत. कविता, समीक्षा या साहित्य प्रकारांतील अत्यंत मौलिक लेखन करणाऱ्या नेमाडे यांची सर्वसामान्य वाचकांच्या मनातील ओळख 'कादंबरीकार' अशीच आहे. 'कोसला' या त्यांच्या पहिल्या कादंबरीने मराठी कादंबरी वाङ्मयात एक नवी वाट रूढ केली. लेखकाने आपली संस्कृती, आपला प्रदेश, आपला समाज याच्या संदर्भात लेखन करावे हा विचार त्यांनी मांडला. अनेक विषयांचा व्यासंग व सखोल चिंतन यामुळे त्यांची 'हिंदू' ही कादंबरी खूप गाजली. पुढील साहित्यिक वाटचालीसाठी छात्र प्रबोधनतर्फे त्यांना खूप खूप शुभेच्छा !!

दहा दिशांचे तट कोसळले, ध्रुव दोन्ही आले जवळी। मीही माझे बाहू पसरून, अवघ्या विश्वाते कवळी।।

। जरूर भेट द्या...bitm@cal2.vsnl.net.in (बिर्ला औद्योगिक व टे नॉलाजिकल म्युझियम ऑफ सायन्स, कलकत्ता) ।

प्रायोजक - प्रतिभा इले ट्रिकल्स, पुणे

खिडकी

खिडकीतून या दिसते सारे
जग हे अनोखे न्यारे वारे
चंद्र, सूर्य, तारे, नक्षत्रे
झाडेझुडपे पर्वत शिखरे ।।१ ।।

कोसळणारा पाऊस दिसतो
अंधारही काळोखा दिसतो
उजेड, वारा, ऊन चमकते
खिडकीतूनही पुढती येते ।।२ ।।

रेलगाडीची खिडकी न्यारी
वडापाव जांभळे हातावरी
खिडकी ही सर्वांस तोषवी
पळती झाडे डोंगर कपारी ।।३ ।।

खिडकी मनाची उघडी असता
जग दिसते आनंदी सर्वदा
मिटून घेता खिडकी पळभर
दु:ख, यातना, वेदना मनाला ।।४ ।।

आनंदाने उल्हासाने
चित्त कवाडा खुले ठेविसी
उत्साहाचा झरा समोरी
निखळ नितळ आनंद उभारी ।।५ ।।

– **मृदुला पाठक**
ज्ञानप्रबोधिनी प्रशाला,
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030

माझ्या घरची विशाल दारे, खुशाल ही राहोत खुली। मज गरिबाची कांबळ वाकळ सकळांसाठी आंथरली।।

। जरूर भेट द्या...www.nehrusciencecentre.org (नेहरू सायन्स सेंटर - मुंबई)।

प्रायोजक – कु. स्पृहा विजय कुलकर्णी, पुणे

निसर्गाजवळ जाण्यासाठी, निसर्गाशी एकरूप होण्यासाठी आणि विविध प्राण्यांना त्यांच्या नैसर्गिक वातावरणात मु त विहार करताना पाहाण्यासाठी जंगल सफारीला पर्याय नाही! प्रस्तुत लेखात टांझानियाच्या एका अभयारण्यातले अविस्मरणीय प्रसंग लेखिका तुमच्यासमोर मांडत आहे.

अभयारण्य भटकंती एक अविस्मरणीय अनुभव...

– सुजाता लेले

सेरेंगेटी अभयारण्यातील राजबिंडा क्राऊन क्रेंच पक्षी

शाळेच्या सहलीमध्ये तुम्ही प्रेक्षणीय स्थळांना भेट देता. सुट्टीमध्ये ट्रेकींगला जाता; पण जंगल सफारीला जाणे मात्र, त्यामानाने वचितच होत असेल. पिंजऱ्यामधले किंवा सर्कशीमधले प्राणी-पक्षी बघण्यापेक्षा त्यांना त्यांच्या स्वातंत्र्यामध्ये बघणेच जास्त अविस्मरणीय असते. आपल्या भारतात काबिनी, पेरियार, मदुमलाई, जिम कार्बेट, पेंच, रणथंबोर, बांधवगड, कान्हाकिसली अशी अनेक अभयारण्ये आहेत. भारताबाहेर केनिया, टांझानिया, झांबिया, नामिबीया इ. 'या' अशी आपल्याला साद घालणारी काही अभयारण्ये आहेत. आपण तेथील भटकंती मात्र डोळसपणे करायला हवी.

सामान्यत: जंगल भटकंतीला पहाटे लवकर निघून न्याहारीला परत येता येते. मग जेवण करून थोड्याशा विश्रांतीनंतर पुन्हा जंगल भटकंती करता येते. पण टांझानियाला मात्र सकाळी ६.३० ते ७ पर्यंत न्याहारी करून मग हॉटेलमधून दुपारचे जेवण घेऊनच सफारीला जावे लागते. कारण जेवणाच्या वेळेपर्यंत हॉटेलमध्ये परतणे श य नसते. टांझानियाच्या जंगल सफारीसाठी आम्ही सहाजण पुण्याहून मुंबईला गेलो. तेथून केनिया *एअरवेजने* नैरोबीला पोचलो. नैरोबीहून किलीमांजरोला विमानाने गेलो. किलीमांजरोहून सफारी जीपने गौरांगोला जायला निघालो. गौरांगो जरा उंचीवर असल्याने थंडी होती. हॉटेलवरून जंगलाचे दृश्य अतिशय सुंदर दिसत होते. टांझानियाच्या प्रत्येक ठिकाणी (जंगलामध्ये जात असताना) आम्हाला सिंह, सिंहीणी, छावे, तरस (हायना), झेब्रे, हजारोंच्या संख्येने वील्डर बीस्ट, हिप्पो (पाणगेंडे), कोल्हे, खोकड, लेपर्ड टॉरटॉइज (बिबट्याच्या कातडीवर जसे ठिपके असतात तसे या जातीच्या कासवाच्या पाठीवर असतात), हत्ती, बिबट्या, मुंगुस, डुकरे, हरणे, चित्ते, जंगली म्हशी, वेलवेट माकडे, गिधाडे, माळढोक पक्षी असे प्राणी, पक्षी सतत दिसत होते, तर काही वेळा दोन-दोन तास काहीच दिसत नव्हते. खाटीक, सुपर स्टारलिंग, लव्हबर्डस्, मारी बुस्ट स्टॉर्क, व्हाईट क्रेन, फ्लेमिंगो, स्टेपी टॉनी ईगल, डव्ह, बार्न घुबड, ब्लॅकविंग काईट, गोअवे पक्षी, हॉर्न बील, क्राऊन बदके, क्राऊन क्रेंच पक्षी असे असंख्य पक्षी दिसले. त्याबरोबरच आम्ही खूप अविस्मरणीय क्षणही अनुभवले.

गौरांगो नॅशनल पार्कला आम्हाला जाताना चार-पाच कोल्हे डुकरीच्या पिल्लांची शिकार करण्याच्या तयारीत दिसले. डुकरांनी त्यांना अशी काही ढुशी दिली, की कोल्हे उलटेच फिरले. तेवढ्या वेळात डुकरीणी आपल्या पिल्लांना घेऊन दिसेनाशा झाल्या आणि कोल्ह्याचा शिकारीचा बेत हाणून पाडला. बाजूला झेब्रे, हरणे, जंगली म्हशी चरत होत्या; पण त्या प्राण्यांना कोल्हा व त्याच्या शिकारीशी काहीही घेणेदेणे नव्हते. थोडेसे पुढे गेल्यावर *सेक्रेटरी बर्ड* झाडाच्या टोकावर बसलेला बघितला. त्याचबरोबर स्वालो पक्षी व *आफ्रिकन फिश ईगल* दिसले.

दुसऱ्या दिवशी गौरांगाहून सेरेंगेटीला निघालो. टांझानियाच्या सर्व लॉजेसना बाजूला कुंपण नाही. हे तेथील वैशिष्ट्य आहे. सेरेंगेटीच्या लॉजमध्ये असताना पहाटे सिंहगर्जना ऐकू आली. सकाळी सेरेंगेटीमधील *वर्ल्ड हेरिटेज* असलेल्या मोठ्या जंगलामध्ये जायला निघालो. बराच वेळ आम्हाला काहीच दिसले नाही. मग थोडे पुढे गेल्यावर झाडाखाली पाच सिंहीणी व त्यांचे सहा छावे दिसले. ते पाणवठ्याकडे येत होते. तसे ते आमच्यापासून दूर होते. तोपर्यंत गाईडच्या सांगण्यावरून आम्ही जेवून घेतले. जेवण झाल्यावर पुन्हा पाणवठ्याच्या जागी आम्ही पोहोचलो. तिथे काही झेब्रे पाण्यात उतरले होते. झाडाखाली बसलेल्या पाच सिंहीणीपैकी एक सिंहीण वाळलेल्या गवतामधून लपतछपत आली अन् तिनं पाण्यात उडी मारली. त्याबरोबर सर्व झेब्रे पाण्यातून बाहेर येण्याचा प्रयत्न करण्यासाठी धडपडू लागले. पाण्यातून बाहेर पडताच विचित्र आवाज काढत झेब्रे जोरात पळू लागले. त्यामुळे सगळीकडे धूळ उडाली. क्षणभर कोणालाही काहीच दिसले नाही. हातची शिकार निसटल्यामुळे सिंहीण हताश झाली होती. ती सिंहीण आमच्या जीपच्या थोडी पुढे जाऊन दमून बसली. मग आणखी तिघीजणी आल्या व तिला चाटू लागल्या. उरलेल्या दोघी मिळून झाडावरून झेब्र्यांची जाण्याची दिशा बघत होत्या. झेब्र्यांचा काळ आला होता; पण वेळ आली नव्हती. आम्ही क्षणभर *ॲनिमल प्लॅनेट* वाहिनी बघत आहोत असेच आम्हाला वाटले. डोळ्यांचे पारणे फिटावे असे थरारक क्षण आम्ही अनुभवले. जंगलामध्ये केव्हा काय होईल? याचा नेम नसतो. सूर्यास्ताला जंगलामध्ये भयाण शांतता दाटते. अशावेळी तिथून बाहेर पडावे, असे प्रकर्षाने वाटते.

संध्याकाळी डूटू ला पोचलो. इथल्या हॉटेलमध्ये *डायनिंग हॉलला* दारच नव्हते. बोचरी थंडी होती. त्यामुळे संध्याकाळी शेकोटी पेटवली. त्यावेळी काही पक्षी, डिक-डिक जातीची छोटी हरणे आमच्याजवळ येत होती. थोड्या लांबवर झेब्रे, एक जंगली म्हैस चरत होते. मनात थोडीशी भीती वाटत होतीच. पण मसाई लोक हातात लांब काठी घेऊन तिथे सतत पहारा करत होते. रात्री जेवत असताना सहजच वरती बघितले, तर जेनेट कॅट नामक प्राणी आले होते. त्यांच्या शरीरावर बिबट्यासारखे ठिपके व तोंड निमुळते होते. दात मात्र अणकुचीदार होते. तिथली व्यवस्थापक म्हणाली, ''घाबरू नका, ओरडू नका, मासांचा तुकडा खाण्यासाठी त्या येतात... अजून दोन येतील.''

दुसऱ्या दिवशी सफारीला निघालो. वैराण जंगलात दूर कुठेतरी एखादं झाड दृष्टीस पडायचं. बाकी सगळीकडे पिवळे गवत, कडक ऊन असल्यामुळे सतत तहान लागत होती. अशा वातावरणामध्ये एक चित्तीण आपल्या जेमतेम एक महिन्याच्या पिल्लांना घेऊन झाडाखाली दमून बसली होती. खूप दूरवरून आलेली असल्यामुळे, पिल्ले दमून झोपून गेली. पण त्यांची आई मात्र आमच्या जीपकडे व *नॅशनल जिओग्राफीच्या* गाडीकडे लक्ष ठेवून होती. सतत सावध होती. नंतर पिले जागी झाल्यावर तिच्या अंगावर खेळत होती. ''एवढ्या कडक उन्हामध्ये त्यांना तहान-भूक लागत नसेल का?'' असे विचारल्यावर गाईड म्हणाला, ''पाणी पिऊन आले असतील तर ६-७ दिवस ते निभावून नेऊ शकतात; ऊन उतरले की चित्तीण इथून

डूटू जंगलातील चित्त्याची दोन पिल्ले

हात अन्नपूर्णचे असले! साफल्याचे अन् तृप्तीचे, ब्रीद जयाचे या धरणीपरि, सदैव ज्यांची वत्सल पाखर आकाशापरि!

। जरूर भेट द्या...www.nscdelhi.org (नेहरू सायन्स सेंटर - न्यू दिल्ली)।

प्रायोजक - श्री. अजित भिडे (डायरे टर, ॲसेंट हॉस्पिटॅलिटी प्रा.लि. २५३८०४०६), **पुणे**

उठून जाईल.'' अन् तसेच झाले. तिनं व पिल्लांनी आमच्या दोन्ही गाड्यांकडे बघितले. जणू काही त्यांनी आम्हाला *टाटा* केले. २/३ तास आम्ही त्यांच्याबरोबर काढले होते. त्यावेळी *नॅशनल जिओग्राफीमधील* काही तज्ज्ञ आम्हाला म्हणाले,

''खरं म्हणजे चित्तीण, इत या छोट्या पिल्लांना घेऊन अशी उघड्यावर बसत नाही. ज्वालामुखीच्या उद्रेकानंतर जे अवशेष भूगर्भातून उडाले त्यांना 'टोपी' म्हणतात. त्या 'टोपी'च्या परिसरात ती चित्तीण लपून बसते.'' मात्र त्यादिवशी आम्हाला ही खास 'भेट'च मिळाली होती. असे क्षण कोणत्याही खरेदीपेक्षा खूपच मोलाचे असतात.

तेथून पुढे तरंगेरच्या जंगलाच्या दिशेने जाताना वाटेत एका कोल्ह्याने डिक-डिक हरणाची शिकार केली होती. ती शिकार तोंडात धरून कोल्हा आपल्या पिल्लांसाठी घेऊन चालला होता. 'एकाला जगविण्यासाठी दुसऱ्याला मारायचे', हाच इथला नियम !

थोडे पुढे गेल्यावर पाहिले तर, इम्पाला हरिणीने नुकताच एका पिलाला जन्म दिला होता; पण आम्ही दिसल्यावर ती पिल्लाला सोडून दूर पळाली. तेव्हा आमचा ड्रायव्हर म्हणाला, 'हरणांचे पटकन फोटो काढा; कारण आपण जास्त वेळ थांबलो तर हरिणी निघून जाईल अन् ते पिल्लू दगावेल.' थोडे पुढे गेल्यावर शहामृगाची जोडी मस्तपैकी नाच करत होती. पंख पसरवून गोलगोल गिर या घेत होती. मोठे विलोभनीय दृश्य होते ते!!

तरंगेरच्या जंगलात 'त्सेत्से' माशांचा खूप उपद्रव होणार होता. त्यावर उपाय म्हणून जंगलात प्रवेश करताना आमच्या गाडीवर औषधाचा फवारा मारला होता; पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. पुढे गेल्यागेल्या ४० हत्तींचा ताफा बघितला. ते हळूहळू जीपच्या जवळ आले, तसे आम्ही गप्प बसलो; नाहीतर ते हत्ती उधळले असते. तिथून आम्ही निघतो तोच जीपला बिबट्या सामोरा आला. काही अंतरावर दोन डुकरे व त्यांची पिल्ले आणि एक कोल्हा होता. कोल्हा त्या पिल्लांची शिकार करायला आला होता. आम्हाला काही समजायच्या आत बिबट्याने एका पिल्लाला पकडले अन् भराभर झाडावर चढला. ते मारलेले पिल्लू फांदीवर टाकले व स्वत: दमून फांदीवर आडवा पडला. तोपर्यंत डुकरांचे व पिल्लांचे भेदक ओरडणे व कोल्ह्याने जोरात ओरडून केलेला पोबारा हे सर्व दृश्य पाहून अंगावर काटा उभा राहिला होता ! आणि त्यात भर म्हणजे विजांचा कडकडाट आणि जोराचा पाऊस. त्यामुळे जीप हळूहळू न्यावी लागत होती. सहानंतर जंगलामध्ये थांबायचे नाही हा नियम आहे. त्यामुळे चिखलामध्ये जीप रूतू न देता वेळेत पोहोचण्यासाठीची दुहेरी कसरत *ड्रायव्हरला* करावी लागत होती. अखेर मु कामापर्यंत पोहोचलो. कारण दुसऱ्या दिवशी पुन्हा पुण्यास परत यायचे होते.

जंगलात शांतता, वनस्पतींचे वास, मध्येच पक्षांचे कूजन, प्राण्यांचे ओरडणे असे सतत चालू असते. काही वेळा काहीच दिसत नसले, तरीही नुसते जंगल-अगदी ते वैराण असले तरी अनुभवावे असेच वाटते. ज्याप्रमाणे एकदा हिमालयात जाऊन आलं, की हिमालय आपल्याला पुन्हा पुन्हा साद घालतो, त्याप्रमाणे जंगल सफारी करून आलो, की जंगल देखील आपल्याला बोलविते. दोन्हीकडे निसर्गच.. एक बर्फाच्छादित म्हणजे जणू हिऱ्यांचा सडा तर जंगलातील निसर्ग म्हणजे हिरव्या पाचूंचा सडा व सोनसळी साखळ्या (वाळलेल्या गवतांच्या काड्या).

मित्रांनो, डोळसपणे निसर्ग बघा. निसर्ग भटकंतीतून वेगवेगळे अनुभव घ्या. निसर्गाकडून आपल्याला खूप काही शिकण्यासारखे आहे... हो नं?

●●●

- सुजाता लेले
३२४ शनिवार पेठ, नंद कॉंपॉंझिटस्, पुणे ३०

म्हणू नका ज्योत सानुली जळे। कणाकणांत तिच्या आत्मयज्ञ तेवे ।।

। जरूर भेट द्या...http://nineplanets.org (जाणून घ्या ग्रहताऱ्यांविषयी बरेच काही)।

प्रायोजक - सौ. रंजना सतीश कुलकर्णी, सातारा

दि. ८ मार्च, जागतिक महिला दिन !! त्या निमित्ताने, कै. सौ. वासंती इनामदार–जोशी आणि कु. सविता कोकाटे या अनुक्रमे साहित्य व क्रीडा क्षेत्रातील विशिष्ट ध्येयाने प्रेरित झालेल्या महिला व युवतीची जडणघडण, ध्येय गाठण्यासाठी त्यांनी दाखवलेली चिकाटी, घेतलेले परिश्रम सोबतच्या दोन लेखांतून जाणून घेऊया. त्यांच्या जिद्दीला सलाम !!

वेदनेतून फुलले गाणे...

– मृणालिनी चितळे

मित्रांनो, हाती पायी धडधाकट असूनही 'हे नाही' आणि 'ते नाही' म्हणून सतत कुरकुणारी मंडळी आपण आजुबाजूला नेहमी पाहत असतो; पण पोलिओमुळे दोन्ही पाय अधू झालेल्या, वयाच्या पंचविशीपर्यंत एकही परीक्षा न दिलेल्या वासंती इनामदारचा पीएच.डी.पर्यंतचा प्रवास त्याचबरोबर कवयित्री, लेखिका म्हणून तिनं मिळवलेली मान्यता याची ही थ क करणारी गोष्ट !

ज्या मुलीला वयाच्या दहाव्या वर्षापर्यंत लिहायला वाचायला येत नव्हतं; त्या मुलीनं काही हजार कथा, कविता लिहिल्या आहेत! एवढंच नाही तर जिनं वयाची पंचविशी ओलांडेपर्यंत एकही परीक्षा दिली नव्हती; तिनं मराठी भाषेतील पीएच. डी. ही सर्वोच्च पदवी मिळवली आहे असं सांगितलं तर तुमचा विश्वास बसेल? न कीच नाही. पण वासंती इनामदार–जोशी हिनं ते खरं करून दाखवलं आहे. त्यासाठी तिनं जी जिद्द दाखवली, जी धडपड केली त्याची ही गोष्ट. मी 'गोष्ट' म्हटलं म्हणून कल्पनेतली नाही, तर अगदी खरीखुरी घडलेली.

त्याचं काय झालं, वासंती दोन वर्षाची असताना तिला पोलिओ झाला. ही गोष्ट १९५० सालच्या आधीची. १९ जानेवारी १९४७ हा वासंतीचा जन्मदिवस. पोलिओ झाल्यामुळे वासंतीचे कमरेपासूनचे दोन्ही पाय लुळे पडले. ते पाहून तिच्या आईवडिलांना मोठाच ध का बसला. त्यांनी सर्व उपाय करून पाहिले. शहरातल्या डॉ टरपासून गावातल्या वैदूपर्यंत सर्वांकडून उपचार करून घेतले. पण कोणाच्याही उपचारांना यश आले नाही.

आपल्याला पाय नाहीत याचं लहानग्या वासंतीला फार वाईट वाटायचं आणि खूप रागही यायचा. 'मला माझ्या पायावर उभं राहून चालायचं आहे', असा हट्ट ती आईकडे हजारदा करायची. मैत्रिणींबरोबर दोरीवरच्या उड्या मारता येत नाहीत म्हणून चिडायची. बसल्या जागेवरून लगोरी फोडता आली, तरी धावता येत नाही म्हणून निराश होऊन जायची. तिचं हे दु:ख पाहून तिच्या आईलाही खूप वाईट वाटायचं; पण म्हणून तिच्या आईनं तिला इतर मुलांपेक्षा वेगळं वागवलं नाही. ती तिला जवळ घ्यायची आणि तिला जमतील अशी कामं सांगायची. तिनं कुणावरही अवलंबून राहू नये, हा त्यामागचा हेतू असायचा. मग वासंती आपापले कपडे धुवून टाकायची. स्वयंपाकात लुडबूड करायची. एवढंच नाही तर आईबरोबर जात्यावर बसून दळायला मदत करायची. शेतावरून येणारं पोतं पोतं धान्य भरडायची. दळताना तिची आई सुंदर ओव्या म्हणायची. त्या ऐकताना वासंतीला कवितेची ओळख होत गेली.

नैराश्येचा शिशिर संपुनी, वसंत आशा फुलवी। कर्तृत्वाच्या वृक्षावरली मृदुल पालवी झुलवी ।।

। जरूर भेट द्या...www.deepseawaters.com (अद्‌भुत समुद्रजैव विविधता)।

प्रायोजक - डॉ. विनायक देसूरकर, पुणे

वासंती हळूहळू मोठी होत होती. तिची इतर भावंडं शिकत होती; पण तिला कुणी शाळेत घातलं नाही. एकतर कुबड्या घेऊनसद्धा ती चालू शकत नव्हती. घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे शाळेसाठी रिक्षा परवडत नव्हती. मग गणवेष घालून शाळेत जाणाऱ्या मुलांकडे ती नुसती पाहत बसायची. ती दहा-अकरा वर्षांची असताना तिच्या मोठ्या बहिणीनं तिला पाटीवर 'ग म भ न' काढून दिले. वासंती ते गिरवायला लागली. तिला गंमत वाटली. तिच्या लक्षात आलं, की आपल्याला पाय नसले तरी लिहिता येऊ शकणार आहे. आपल्याला चालता येत नाही म्हणून सतत रडणारं तिचं मन लिहिण्यावाचण्यात रमू लागलं. तिला लिहायला यायला लागलं, तेव्हापासून ती कविता लिहू लागली. ती पाटीवर कविता लिहायची आणि पाटी भरली, की पुसून टाकायची.

वासंती तेरा-चौदा वर्षांची असताना पुणे आकाशवाणी केंद्राकडे स्पर्धेसाठी, तिनं एक निबंध पाठवला. विषय होता 'माझा आवडता पक्षी.' तिला पहिलं बक्षीस मिळालं आणि आकाशवाणीकडून कार्यक्रमात भाग घेण्यासाठी आमंत्रण आलं. तिनं 'मी येत नाही' असं कळवून टाकलं; कारण आपल्याला असं खुरडत चालताना पाहून लोक हसतील, अशी तिला भीती वाटायची. त्या कार्यक्रमाच्या प्रमुख होत्या सुप्रसिद्ध दिग्दर्शिका सई परांजपे. त्यांना वासंतीची हकीगत कळल्यावर त्या स्वत: तिच्या घरी गेल्या. तिची समजूत घालताना त्या म्हणाल्या, ''वासंती, लोक बघ कशालाही हसतात. मी लठ्ठ आहे म्हणून मलासुद्धा हसतात. म्हणून मी बाहेर जायची थोडीच थांबते? लोकांना हसता येतं; पण तुझ्यासारखं पहिलं बक्षीस कुठे मिळवता येतं? आपण त्यांच्याकडे मुळीच लक्ष द्यायचं नसतं.'' सई परांजपे यांचं बोलणं ऐकून वासंतीला खूप धीर आला. त्यांच्या 'बोलां'नी वासंतीला खूप शिकवलं. वासंती कार्यक्रमाला गेली. तिला आत्मविश्वास आला.

वासंती हळूहळू मुलांच्या मासिकाकडे कविता पाठवू लागली. ती छापून आली, की वासंतीला विलक्षण आनंद व्हायचा. कवितेखालचं बालकवयित्री वासंती इनामदार हे नाव ती पुन:पुन्हा वाचायची. शिवाय कवितेसाठी जे मानधन मिळायचे त्याचीही अपूर्वाई तिला वाटायची. पण त्याहूनही जास्त आनंद व्हायचा तो कविता छापून आली, की अख्खं मासिक घरी यायचं त्याचा! त्या वयात तिला खूप वाचावंसं वाटायचं. पण पुस्तकं विकत घेणं म्हणजे चैनीची गोष्ट ठरली असती. मग भावाबहिणीची अभ्यासाची पुस्तकं ती वाचत बसायची. अगदी व्याकरणाचं पुस्तकसुद्धा!!

वासंतीची अभ्यासाची आवड पाहून तिच्या बहिणीनं तिचा एस. एस. सी.चा अभ्यास घरच्याघरी करून घ्यायचा ठरवलं. वासंती झटून अभ्यासाला लागली. जेव्हा तिनं पहिली परीक्षा दिली तेव्हा तिचं वय होतं सत्तावीस वर्ष. उत्तीर्ण

अनंत आमुची ध्येयास ती अनंत अन् आशा। किनारा तुला पामराला॥

। जरूर भेट द्या...www.historyoftheworld.com (वेगवेगळ्या देशांचे कालखंडासह इतिहास)।

प्रायोजक - श्री. निनाद रामचंद्र कात्रे, डोंबिवली

होण्यासाठी किती लिहायचं याचा तिला अंदाज येत नव्हता. मनावर प्रचंड ताण आला होता. परंतु कुशाग्र बुद्धिमत्ता लाभलेली वासंती पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाली. घरच्यांना केवढा तरी आनंद झाला.

वासंतीची उमेद वाढली. तिनं पुढे शिकायचं ठरवलं. घराजवळच्या महाविद्यालयात तिनं नाव घातलं. आपली तीनचाकी सायकल घेऊन बहिणीच्या मदतीनं वासंती महाविद्यालयात जायची. हाताच्या आधारानं ती ४/४ जिने चढायची. गर्दीतून वाट काढताना तिला ब्रह्मांड आठवायचं. जिने चढून-उतरून कंबर दुखायची. पावसाळा आला, की कॉलेज सोडून द्यावंसं वाटायचं. पण तरीही मनाची जिद्द कायम ठेवून तिनं बी. ए. पूर्ण केलं. नुसतं पूर्ण केलं नाही तर मराठी विषयात सुवर्णपदक मिळवलं. त्यापूर्वीच तिच्या 'माझी बडबड गाणी' या काव्यसंग्रहाला राज्य पुरस्कार मिळाला होता.

मासिकं, आकाशवाणी, दूरदर्शन यावरून तिच्या कथा, कविता प्रसिद्ध होत होत्या. त्यांना पुरस्कार मिळत होते. पूर्वी घराबाहेर पडायचं टाळणारी वासंती उत्साहानं कार्यक्रमात भाग घ्यायला लागली होती. तिनं एम. ए. करायचं ठरवलं. आणि उत्तम गुणांनी एम. ए.ची परीक्षा वासंती उत्तीर्ण झाली.

त्याच्या पुढची पदवी म्हणजे पीएच. डी.! परंतु तो अभ्यास सुरू करण्यापूर्वी तिनं नोकरी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. कारण पैसे मिळवून तिला खऱ्या अर्थानं आपल्या पायावर उभं राहायचं होतं; पण तिला नोकरी मिळेना. घरून तिच्या लग्नाची खटपट चालू होती. वासंतीची लग्न करायला हरकत नव्हती. एखादा अपंगच माणूस तिच्या अडचणी आणि दु:ख समजून घेईल असं तिला वाटत होतं. त्यामुळे आपला जोडीदार अपंगच असावा असं वासंतीला वाटत होतं. सुदैवानं वासंतीला हवा तसा जोडीदार मिळाला. तिचे पती श्री. जोशी ह्यांनाही लहानपणी पोलिओ झाला होता. मांड्यांना चिकटलेले पाय सरळ करण्यासाठी त्यांच्यावर आठ शस्त्रक्रिया झाल्या होत्या. अनंत अडचणींना तोंड देत शिक्षण पूर्ण करून ते शिवाजी विद्यापीठामध्ये ग्रंथपाल या पदावर नोकरी करत होते.

लग्न करून वासंती कोल्हापूरला गेली. तिथं तिचं पीएच. डी.चं काम जोरात सुरू झालं. श्री. जोशी ग्रंथपाल असल्यामुळे अनेक पुस्तकं तिला सहज उपलब्ध झाली. 'समग्र बोरकर' हा हजार पानी प्रबंध लिहून तिनं पीएच. डी. मिळवली.

श्री. जोशी 'अपंग मूलाधार केंद्र' या संस्थेमार्फत अपंगांसाठी अनेक कामं करत. वासंती त्यांच्या कामात सहभागी झाली. तिथं तिला जाणवलं, की आपल्यापेक्षाही कितीतरी पटीनं अधिक अशी विकलांग माणसं असतात. त्यांना घरातूनही चांगली वागणूक मिळत नाही. त्यांच्यासाठी काम करताना तिला मनापासून आनंद मिळत असे. या कामाबरोबर तिचं लेखनही चालू होतं. तिच्या जवळजवळ पाच हजार कविता, तीन हजार कथा आणि चार कादंबऱ्या पुस्तक रूपानं प्रसिद्ध झाल्या. अनेक मानसन्मान तिला मिळाले. १९९० साली वसई इथे भरलेल्या अखिल भारतीय 'मराठी अंध-अपंग साहित्य संमेलना'ची अध्यक्ष होण्याचा मान तिला मिळाला. माजी पंतप्रधान श्री. अटल बिहारी बाजपेयी यांच्या हस्ते साहित्यिक क्षेत्रातील कामगिरीबद्दल दिल्ली येथे तिचा सन्मान करण्यात आला. उज्ज्वल भविष्यकाळ तिच्यापुढे उभा होता. परंतु कर्करोगासारख्या असाध्य आजाराने तिला ग्रासले. रुग्णालयात दाखल केल्यावरही तिनं हातात घेतलेले लहान मुलांच्या नाटुकल्यासंबंधीचे काम पूर्ण केले आणि मगच ३ एप्रिल २०१० साली ती मृत्यूला सामोरी गेली.

वासंतीची ही कथा नव्हे सत्यकथा; म्हणजे अंगभूत गुण आणि अपार जिद्द यांचं चालतंबोलतं प्रतीक आहे.

●●●

- मृणालिनी चितळे
७५९/३२, गोपिकाश्रम,
डे कन जिमखाना,
पुणे 411004

ज्या क्षणाला घेतला मी सूर्यसुमनाचा वसा। आंधळ्या वेड्या व्रताचा लाभला मज वारसा ।।

। जरूर भेट द्या...www.indiannaturewatch.net (निसर्ग, प्राणी पक्षी, फुले इ. बद्दल सर्व काही)।

प्रायोजक - डॉ. प्रियदर्शी सावंत, बोरीवली

सविता कोकाटे

खेळाच्या शाळेने मला घडवले !

जिथे शाळाही नाही अशा आडगावातील सविता. अंगीभूत क्रीडा कौशल्यांमुळे ज्ञान प्रबोधिनीच्या क्रीडाकुलात आली. घरच्यांचा विरोध पत्करून, त्यांचे मन वळवून गावच्या वातावरणातून शहरात येऊन रुळण्यासाठी मुलगी म्हणून तिला करावी लागलेली धडपड, हा सारा प्रवास तिच्यासाठी निश्चितच अवघड असणार!
भरपूर कष्ट करून खेळातील राष्ट्रीय पुरस्कार मिळवण्याऱ्या सविताची जिद्द, धडपड तुम्हाला खूप काही सांगून जाईल.

दि. १६ ऑगस्ट २०११ चा दिवस मी माझ्या आयुष्यात कधीही विसरू शकत नाही. या दिवशी मला राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेत ‘सुवर्णपदक’ मिळाले होते. त्यानंतर माझी व आमच्या संघातील चार मुलींची राष्ट्रीय स्तरावर कबड्डी सामन्यासाठी निवड झाली होती. याच वर्षी १४ वर्षांखालील मुलींच्या कबड्डी संघाचे नेतृत्व करण्याची संधीही मिळाली. मला ‘कर्णधार’ पद मिळाले होते. या यशाकडे आज मागे वळून बघताना कष्टाचे, यशापयशाचे सर्वच क्षण डोळ्यासमोरून गेले; आणि आतापर्यंतच्या धडपडीचे सार्थक झाल्यासारखं वाटलं.

माझं गाव ‘वडेश्वर’ अगदी छोटंसं. गावात शिक्षणाची सोय नव्हती; अगदी पहिलीपासूनच माझ्या आई-वडिलांनी मला वसतिगृहात ठेवले होते. घरी जाण्यासाठी डोंगर वाटेनं चालत जावे लागे. सुरुवातीला घरच्यांची खूप आठवण येई. दर शनिवारी डोंगर ओलांडून चालत घरी जायचे आणि सोमवारी परत वसतिगृह गाठायचे. चौथीपर्यंत हा प्रवास असाच चालू होता.

पाचवीत असताना ‘ज्ञान प्रबोधिनी’ निगडी येथील शिक्षक आमच्या वसतिगृहात आले होते. त्यांनी १५० मुलींची खेळाच्या माध्यमातून चाचणी घेतली. खरंतर या खेळांतून एका मोठ्या खेळाडू घडवणाऱ्या शाळेत आमची निवड होणार होती हे आम्हाला नंतर कळालं.

शहरातील मोठ्या शाळेत शिकण्याचे आकर्षण लहानपणापासूनच होते. आपली निवड या शाळेत व्हावी असं मनापासून वाटत होतं, आणि झालंही तसंच. ज्या दहा मुलींची निवड झाली त्यांच्यात मीही एक होते. पहिल्या यादीत निवड झाल्यावर पुन्हा दुसरी निवड फेरी निगडीलाच झाली. त्यातही माझी निवड झाली होती. खूप मोठी गोष्ट मिळाल्यावर आनंद होतो, तसा आनंद त्यावेळी मला झाला होता. आता घरच्यांकडून परवानगी मिळवण्यासाठीचा खरा कसोटीचा प्रसंग होता. सर्व शिक्षकांच्या मदतीने हाही डोंगर पार पाडला आणि निगडीच्या क्रीडाकुलमध्ये प्रवेश घेतला.

अगदी खेडेगावातून शहरीभागात आल्यावर इथल्या वातावरणाशी जुळवून घेताना शाळेतील शिक्षकांची मोलाची साथ मिळाली. अभ्यासाबरोबरच वेगवेगळ्या खेळांबद्दलची जागरूकता वाढत होती. सुरुवातीला फ त खेळायचं आणि जिंकायचं एवढंच ठरवलं होतं. ‘नॅशनल’ म्हणजे काय आणि ‘स्टेट’ म्हणजे काय, हे इथे आल्यावरच समजलं.

सुरुवातीला कबड्डी आणि ॲथलेटि समधील ‘थाळीफेक’ व ‘गोळाफेक’ या खेळांसाठी माझी निवड झाली. राष्ट्रीय खेळाडू होण्याचा मी निश्चय केला होता. त्या दृष्टीने प्रयत्न आणि सराव मनापासून करत होते. या खेळासाठी लागणारी आवश्यक कौशल्ये आत्मसात करणं आणि त्यासाठी खूप सराव करत राहाणं असा प्रवास सुरू होता. काही दिवसातच मी जिल्हास्तरीय आणि नंतर राज्यपातळीवरील सामन्यांमध्ये भाग घेऊ लागली.

सद्विचार पठणात असू दे। सत्कार्याचा ध्यास असू दे।।

। जरूर भेट द्या...www.cheatschannel.com (संगणकीय खेळासाठीच्या लृप्त्या)।

प्रायोजक - श्री. सौरभ सुधीर दप्तरदार, पुणे

आम्ही जेव्हा प्रथम राज्यपातळीवर खेळणार होतो; तेव्हाचा एक प्रसंग आमच्या गटातील प्रत्येकालाच अविस्मरणीय असा होता. सगळ्यांनी मिळून खूप सराव केला होता. प्रत्यक्ष सामने चार दिवस आलेले असताना आमच्या गटातील सगळ्यात चांगल्या खेळाडूचा हात 'फ्रॅ चर' झाला होता आणि ती आता यावेळच्या मॅचमध्ये खेळू शकणार नव्हती.

आमच्या गटाचं अवसानच गेल्यासारखं वाटत होतं, पण शिक्षकांनी आमच्या प्रतिस्पर्धी गटातील खेळाडूंच्या काही 'व्हिडीओ िलप्स' आम्हाला दाखवल्या. ते कशाप्रकारे खेळतात, कोणती कौशल्ये वापरतात, त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी आम्हाला काय करता येईल? प्रत्येक प्रतिस्पर्धी खेळाडू कसे डावपेच वापरतो याचा आम्ही अभ्यास केला. त्यासाठी आम्ही कोणती कौशल्ये आत्मसात करायला हवी यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले. आमच्यातली सर्वोत्तम खेळाडू अनुपस्थित आहे; हे सामने सुरू होईपर्यंत आम्ही समोरच्या गटाला कळूच दिलं नाही; आणि खूप आत्मविश्वासाने आम्ही ही मॅच जिंकलो.

कबड्डीच्या स्पर्धेमध्ये वयोगटाप्रमाणे, १४ वर्षांखालील व १६ वर्षांखालील असे गट असतात. मी १४ वर्षांखालील गटांत खेळत असताना कबड्डीच्या गटाला अचानक 'वजनी गट' आला आणि नियमानुसार ४५ किलो वजन असलेले खेळाडूच खेळू शकत होते. माझे वजन ५३ किलो होते. त्यामुळे यावेळी खेळण्याची संधी मला मिळणार नव्हती. स्पर्धा महिन्यावर येऊन ठेपली होती. सरांनी मला वजन कमी करण्याची कल्पना सुचवली. मी त्याच दिवसापासून वजन कमी करायला सुरुवात केली. एका महिन्यात ८ किलो वजन कमी होणे श य नव्हतं. मी शेवटपर्यंत प्रयत्न करायचं ठरवलं होतं. सरांनी व ताईनं मला खूप मदत केली. त्यांच्या मार्गदर्शनाने माझ्यातील जिद्द वाढत असे. काटकपणा तर होताच; पण एखादी गोष्ट मिळवायची असेल तर त्यासाठी कसे प्रयत्न करावे, हे माझ्या प्रशिक्षकांनी सांगितले. शाळेतील डॉ टर, मानसतज्ज्ञ तसेच शिक्षक यांनी मला खूप मदत केली.

स्पर्धा १० दिवसावर आल्या असताना माझं वजन ३ किलो जास्तच होतं. मी दर दोन दिवसांनी 'फ्रूट डाएट' करत असे. रोजच्या धावपळीमुळे कौशल्ये आत्मसात करण्याकडे दुर्लक्ष झालं. त्याचवर्षी गोळाफेक व थाळीफेक हे खेळ सोडण्याचा निर्णय घेतला; आणि पूर्णपणे कबड्डीवर लक्ष केंद्रित केले. शेवटचे दोन दिवस मी काही न खाता उपवास केला आणि स्पर्धेच्या दिवशी माझं वजन ४४ किलो भरलं. याचा माझ्यापेक्षाही जास्त आनंद माझ्या शिक्षकांना झाला.

त्यावर्षी १४ वर्षाखालील गटात आमच्या संघाने प्रथम क्रमांक मिळवला. विभागस्तरावर विजय मिळवून आम्ही राज्यस्तरावर 'सुवर्णपदक' मिळवले. मला राष्ट्रीय 'कर्णधारपद' देण्यात आले. त्यावेळी मला माझ्या सरावाचे सार्थक झाल्यासारखे वाटले. आता माझ्या दोन राष्ट्रीय व चार राज्यस्तरीय अशा स्पर्धा आहेत. माझ्या ध्येयापर्यंत पोहोचण्याची जिद्द मी सोडली नाही. आता मी बारावीत शिकत आहे, माझा खेळाचा सरावही सुरू आहे आणि मला खेळातच करिअर करायचं आहे. खरंच खेळाच्या शाळेनंच मला घडवलं !

●●●

– सविता कोकाटे

ज्ञान प्रबोधिनी, क्रीडाकुल, से टर क्र. २५,
यमुनानगर, निगडी प्राधिकरण, पुणे

(पूर्व प्रसिद्धी : छात्र प्रबोधन ग्रामीण दिवाळी अंक
सौर कार्तिक शके १९३६/नोव्हेंबर २०१४)

राखेतून उंच उडून गगनगिरी जाईन मी। मृत्युंजय मु तीचे गीत नवे गाईन मी।।

। जरूर भेट द्या...www.letsfindout.com (अ लासरूम मॅगॅझिन)।

प्रायोजक - श्री. जगजीत कुलकर्णी, चिंचवड, पुणे

लेखांक ७

समस्या परिहार

समस्या परिहार – प्रश्नावली

– मनीषा मिरजकर

आपल्या सगळ्यांना सतत समस्या येतात. कदाचित तुम्हाला शाळेत जाताना, ‘बस चुकली किंवा सायकल नादुरुस्त झाली’ अशी समस्या आली असेल. तुमच्या आईला, ‘सर्वांना आवडेल असा काय स्वयंपाक करू?’ अशी समस्या येत असेल. तुमच्या छोट्या भावाला, ‘मित्रांबरोबर काय खेळू?’ असा प्रश्न तर शाळेतल्या शिक्षकांना, ‘स्पर्धेसाठी कुठले नाटक बसवावे?’ असा प्रश्न पडत असेल. पोलिसांना, ‘शहरात शांतता कशी राखता येईल’ तर देशाच्या पंतप्रधानांना, ‘देशातील गरिबी, देशाची प्रगती, इतर देशांशी संबंध’ अशा अनेक समस्या येत असतील.

तुमच्या समोरच्या समस्या सोडवण्याचा तुम्ही डोळसपणे प्रयत्न करावा यासाठी दिवाळी अंक सौर कार्तिक/नोव्हेंबर २०१४ पासून **समस्या परिहार** ही लेखमाला सुरू झाली. या लेखमालेत आतापर्यंत तुम्ही समस्या म्हणजे काय? समस्या व अडचण यामधली सीमारेषा, समस्या कशी ओळखायची? त्या सोडविण्याच्या म्हणजेच समस्या परिहाराच्या पायऱ्या कोणत्या? समस्या परिहारासाठी लागणारी कौशल्ये कोणती हे तपशिलात जाणून घेतले. सोबतच्या लेखात– तुम्ही आलेल्या समस्यांना कसं सामोरं जाता? त्या समस्या तुम्ही कशा सोडवता? हे जाणून घेण्यासाठी प्रश्नावली दिली आहे. ती वाचून तुम्ही योग्य पर्याय निवडा. त्यानुसार समस्या परिहाराची तुमची पद्धत योग्य आहे की अयोग्य हे तुमच्या लक्षात येईल. अंकात दिलेल्या पद्धतीने तुम्हीच तुमचे मूल्यमापन करून तुम्हाला समस्या सोडविण्यासाठी कोणती कौशल्ये विशेषत्वाने आत्मसात करावी लागतील त्यांचा विचार करा.

प्रश्नावली : खालील विधाने नीट वाचून तुम्हाला जो पर्याय योग्य वाटतो तो निवडा.

क्र.	विधाने	नेहमी	कधीतरी	कधीच नाही
१.	माझ्या समस्या सोडवण्यासाठी मला कोणाची तरी मदत लागते.			
२.	माझ्या समस्या मी शेवटच्या क्षणी सोडवतो/सोडवते.			
३.	समस्या आल्यावर मला गांगरून जायला होते.			
४.	मी माझ्या समस्या सर्व तपशील लक्षात न घेता सोडवतो/सोडवते.			
५.	पर्याय शोधून, ज्या पर्यायाने समस्या लवकर सुटेल तो पर्याय मी निवडतो/निवडते.			
६.	समस्या सुटल्यानंतर मी त्याचे मूल्यमापन करतोच/करतेच असे नाही.			
७.	समस्या सुटली नाही तर मी परिस्थितीला दोष देतो/देते.			

वारा सदैव गाई स्वातंत्र्यगीत येथे। उत्तुंग पर्वतांचे उन्नत सदैव माथे।।

। जरूर भेट द्या...www.krampf.com (१-२ मिनिटांत करता येणारे सोपे प्रयोग)।

प्रायोजक - श्री. निखिल धारवाडकर, बंगळुरू

जर तुम्ही चार किंवा जास्त विधानांना **नेहमी** असा पर्याय निवडला असेल तर : तुमचा कल समस्या गांभीर्याने घेण्याकडे नाही. तुम्ही समस्या परिहाराची योग्य पद्धत शिकून ती आचरणात आणण्याची गरज आहे.

जर तुम्ही चार किंवा जास्त विधानांना **कधीतरी** असा पर्याय निवडला असेल तर : तुम्हाला समस्या सोडवण्याच्या काही पद्धती माहीत आहेत. पण नेहमी त्या तुम्ही पाळता असे नाही. समस्या परिहाराची योग्य पद्धत शिकून तुमच्या पद्धतीत सुधारणा करा.

जर तुम्ही चार किंवा जास्त विधानांना **कधीच नाही** असा पर्याय निवडला असेल तर: समस्या परिहाराची योग्य पद्धत तुम्ही वापरत आहात. तरी ती बरोबर आहे का हे पडताळून बघा.

●●●

– **मनीषा मिरजकर,** ए ३, ६०२, धवलगिरी, रामबाग कॉलनी, पौड रस्ता, कोथरुड, पुणे 411038

(पूर्व प्रसिद्धी : छात्र प्रबोधन ग्रामीण दिवाळी अंक सौर कार्तिक शके १९३६/नोव्हेंबर २०१४)

आवाहन

सुट्टीत 'खरी' धम्माल करण्यासाठी वेळ राखून ठेवा !

छात्र प्रबोधनच्या खालील उपक्रमांमध्ये सहभागी व्हा.

१. जोडीकार्य उपक्रम (एप्रिल-मे २०१५)(इयत्ता ७ वी ते १० वी)

तुमच्याच गावात विविध प्रकारचे अनुभव तुमच्या गतीनुसार, वेळेनुसार, घेण्याची विशेष संधी !
साहस, संवाद व बुद्धीच्या विविध पैलूंना खाद्य देणाऱ्या अनुभवांची साखळी ! म्हणजेच ७ वेगवेगळ्या प्रकारची कामे जोडीने पूर्ण करण्याची संधी. ही कामे करता करता अनपेक्षित प्रसंगांना सामोरे जात आत्मविश्वास आणि व्यवहारचातुर्य वाढवा. **७ कामे पूर्ण करणाऱ्यांसाठी अभिवाचन कार्यशाळा !**

(इयत्ता ८ वी ते १२ वीच्या मुला–मुलींसाठी)

२. 'कार्यानुभव' घ्या... समृद्ध व्हा... (मे २०१५)

'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात या आणि लेखन, संपादन, प्रकाशन इ. कामातील 'मजा' अनुभवा !
अनुभवी व्य तींबरोबर काम करण्याचा, नवीन काही शिकण्याचा अनुभव घ्या.

३. अभिवाचन कार्यशाळा (जून २०१५)

तज्ज्ञ व्य तींचे मार्गदर्शन, सुप्त नाट्यगुणांना वाव देणारी, वाचिक अभिनयाला खतपाणी घालणारी, साहित्याची गोडी वाढवणारी, ३ दिवसांची कार्यशाळा सहभागी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाने समारोप

४. विद्यार्थी विशेषांक-लेखन, संपादन

छात्र प्रबोधनच्या विद्यार्थी विशेषांकासाठी (सौर आषाढ, जुलै २०१५) कथा, कविता, ललित, भटकंती, ज्ञान-विज्ञान इ. प्रकारातील कसदार, लयदार, लालित्यपूर्ण असे तुमचे मु त लेखन पाठवा. मुखपृष्ठासाठी तुम्ही काढलेली चित्रे पाठवा. **साहित्य व चित्रे पाठवण्याचा अंतिम दिनांक – १५ मे २०१५**

विद्यार्थी विशेषांकाच्या संपादनात ज्यांना रस असेल अशांनी आपली नावे 'छात्र प्रबोधन'च्या कार्यालयात २५ एप्रिल २०१५ पर्यंत जरूर नोंदवावीत. (अधिक तपशील पुढील अंकात)

अधिक माहितीसाठी संपर्क : ☎ ०२०-२४२०७ १७४/१७९ (वेळ दु. : १२ ते ३)

करा बुद्धीची ऐरण, विवेके घालावे घण। कसोटीत ह्या उजळून घ्यावा, जुना नवा तो विचार आपण।।

। जरूर भेट द्या...www.nasa.gov.in (अमेरिकन स्पेस एजन्सी नासाबद्दल)।

प्रायोजक - श्री. अजित कानिटकर, पुणे

बगीचा

– श. मा. पाटील

कोणीतरी आपल्यासाठी आपल्या शाळेचा परिसर स्वच्छ ठेवावा असं आपल्याला वाटत असतं. हो ना? मग 'कोणीतरी' करण्यापेक्षा आपणच पुढे झालो तर? या विचारानं झपाटलेल्या बालचमूने एकजुटीने श्रमदान करून बगीचा कसा आकाराला आणला हे या कथेत वाचा...

जांभळदऱ्याच्या गावकऱ्यांनी शाळेला एकदाचा पाण्याचा हौद बांधून दिला. सारे गावकरी जमले. शाळेच्या कडेला एक पडीक जागा होती. त्या जागेवर हौद बांधला. पाणी भरण्याची व्यवस्था कोळी समाजातील रंगाने स्वत: करून दिली. पाण्याचा वापर चालू झाला. पण एक नवीन समस्या निर्माण झाली. हौदाच्या सांडपाण्याची ती समस्या होती. विद्यार्थी डबे, भांडी धुवायचे. त्या सर्वांचे खरकटे पाणी हौदाभोवताली साठायचे. त्यावर डास–माशा व्हावयाच्या. अस्वच्छता व्हायला लागली होती.

प्रणव, प्रणिता, प्रज्ञा, प्रकाश, प्रगती या मित्रांची एकदा मैफिल जमली. बोलता बोलता विषय निघाला हौदाच्या सांडपाण्याचा, त्यामुळे निर्माण झालेल्या अस्वच्छतेचा. हौदाच्या भोवतालची जागा साफसूफ करून त्या जागेचा उपयोग चांगल्या कामासाठी करायचा असं ठरलं.

घटक सत्राची परीक्षा संपून तिचा निकाल हाती आला होता. नवीन अभ्यासाला सुरुवात होणार होती. विद्यार्थ्यांना वेळ रिकामाच होता. शाळेत गणेशोत्सवाची तयारी सुरू झाली. क्रीडांगण स्वच्छ झाले. कचरा हौदाच्या बाजूलाच एका कोपऱ्यात टाकण्यात आला. प्रणिता विचार करू लागली, क्रीडांगणाची स्वच्छता झाली; पण सांडपाणी? त्याचे काय करायचे? मित्र मैत्रिणींनी परत एक बैठक घेतली. त्यामध्ये ठोस निर्णय घेतला.

दुसरा दिवस उजाडला. प्रणवने वडिलांकडून टिकाव व खोऱ्या मागून घेतला. पाटी मागून घेतली. सर्व साहित्य घेऊन तो आणि त्याचा मित्र प्रकाश शाळेत आले. प्रणिता, प्रज्ञा आणि प्रगती त्यांच्यात सामील झाल्या. शाळेच्या मुख्याध्यापकांना योजना पटवून दिली. त्यांनाही आनंद झाला. त्यांनी शिक्षकांच्या मदतीने काम पार पाडावयाचे ठरवले. शुभस्य शीघ्रम् !

हौदाभोवताली आखणी करून घेतली. टिकाव आणि खोऱ्या घेऊन सर्वजण कामाला लागले. टिकावाने *मार्किंग* करून झाले. खोऱ्याने जमीन ओढायला सुरुवात केली. जादाची जमीन उताराकडे ओढून घेतली. प्रणव आणि प्रकाश पाटीने मातीची *लेव्हल* करू लागले. थोडा वेळ गेला. विश्रांतीची वेळ झाली. मुख्याध्यापकांनी छोटीशी सभा घेतली. या विद्यार्थ्यांनी आखलेली योजना सर्वांना समजावून सांगितली. सर्वांनाच आनंद झाला. सर्वांना मुलांनी एकमुखाने घेतलेल्या निर्णयाचे कौतुक वाटले. मोठे दगड, छोटा मुरुम सर्व लेव्हलमध्ये आले.

दुपारचे जेवण घेऊन पुन्हा कामाला सुरुवात झाली. कडेच्या *मार्किंगच्या* मधली जागा दोन–दोन मीटर लांब आणि अर्धा मीटर खोलवर खणण्यात आली.

प्राप्तकाल हा विशाल भूधर, सुंदर लेणी तयांत खोदा। निजनामें त्यांवरती नोंदा, बसुनि का वाढवितां मेदा? ।।

। जरूर भेट द्या...www.arti_india.com (शेती, ऊर्जा, ग्रामीण विकासासाठी काम करणारी संस्था)।

प्रायोजक - सौ. गीतांजली हेमंत जोशी, वाशी, नवी मुंबई

त्यासाठी कांबळे सर, चित्राव सर यांनी विशेष परिश्रम घेतले. बाहेरच्या बाजूने मुरुम लावला गेला. पूर्ण पडीक जमीन अशारीतीने खणून झाली. मधोमध एक उभा चर खणला. त्या दिवशीचे काम संपले. प्रणिता, प्रणव, प्रगती यांनी मुख्याध्यापकांना पुढची योजना सांगितली.

तिसऱ्या दिवशी शाळेचे काम म्हणून विठोबादाजींनी आपल्या शेतातली काळी माती द्यायचे कबूल केले होते. बैलगाडीची व गड्याची व्यवस्था त्यांनीच केली होती. हा हा म्हणता तीन-चार बैलगाड्या माती शाळेच्या हौदाजवळ येऊन पडली. ते बघून शाळेतील शिक्षकांना आणि मुख्याध्यापकांना खूपच आनंद झाला. त्यांनी विठोबादाजींना आणि त्यांच्या शेतकऱ्यांना आवर्जून चहापाणी घ्यायला बोलावले. विठोबादाजींनी प्रणव, प्रणिता यांनी शेतातली काळी माती देण्यासाठी कशी गळ घातली हे तपशीलवार सांगितले. मुख्याध्यापकांना त्या चार-पाच मुलांविषयी फारच अभिमान वाटला. विठोबादाजींच्या हातून त्यांनी काळी माती टाकून शाळेचे एक 'जाणते मदतगार' असा त्यांचा गौरव केला आणि वरचेवर त्यांचे सहकार्य शाळेला मिळेल अशी अपेक्षा व्य त केली.

चौथा दिवस उजाडला. आता शाळेचे मोठे विद्यार्थी जमा झाले. त्यांनी मिळून चार खड्डे खणले. तीन बाय तीन आणि तीन फूट खोल खड्डे. त्यातून निघालेला मुरूम प्रत्येक खड्ड्याभोवती जमा केला. योजना अशी, की राहिलेले खरकटे त्या खड्ड्यात टाकले जावे आणि तो खड्डा मुरूम टाकून बुजवून घ्यावा. एक भरला की दुसरा, मग तिसरा आणि नंतर चौथा. खरकटे अन्न तोवर क्रमाक्रमाने कुजून त्याचे खत व्हावे. ते खत वापरात यावे. तोपर्यंत शिक्षक व मुले यांनी माती भिजवून घेतली. काही मुलांना त्यांच्या माहितीच्या ठिकाणाहून निशीगंध, मोगरा, पांढरी-तांबडी सदाफुली, विविध प्रकारची शेवंती यांची रोपे आणावयास सांगितली होती. त्याप्रमाणे सर्व रोपे जमा झाली. सर्व शिक्षक व विद्यार्थी-विद्यार्थिनींनी रोपे लावली. चौथा दिवस मावळला.

पाचव्या दिवशी मुख्याध्यापकांनी सर्वांना आश्चर्याचा ध का दिला. त्यांनी कुठून तरी लॉनची गादी विकत आणली. तिचे लहानलहान तुकडे केले आणि बागेतला सर्व भाग व्यवस्थित खणून त्या भागावर ते लॉन लावले. दररोज पाणी पुरविले. त्यासाठी व्यवस्थित पाट काढून सांडपाणी फुलांच्या रोपांना जाईल अशी योजना केली.

गणेशोत्सवाची समारंभपूर्वक सांगता झाली. या वर्षीचा गणेशोत्सव विशेष होता. प्रणव, प्रणिता, प्रज्ञा, प्रकाश, प्रगती या सवंगड्यांनी मिळून एक आगळावेगळा गणेशोत्सव अंमलात आणला होता. क्रीडांगण आणि बगीचा यांचा सुंदर मेळ बसला होता. खड्डे उपयु त झाले होते. शाळेला खूप सुंदर रूप आले होते. लवकरच बगीचा मोठा झाला. सर्व विद्यार्थी -विद्यार्थिनी आणि शिक्षक बगीच्यात जेवायला बसू लागले. अर्थात, जेवण झाल्यावरच्या स्वच्छतेला अग्रक्रमांक मिळाला. जे मोठ्यांना जमले नाही, ते शाळेतील काही विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने, श्रमदानाने सहज श य झाले. फुललेला बगीचा बघून प्रणव, प्रणिता, प्रज्ञा, प्रकाश आणि प्रगतीच्या चेहऱ्यावर समाधानाचे हसू पसरले.

●●●

- श. मा. पाटील
सिद्धीविनायक मंदिराजवळ साईनगर,
एम.आय.डी.सी. रस्ता, उस्मानाबाद

गुंफूनी आपुल्या मनास चढवा, स्वप्नवेल गगनी। काटे ठेवून बाजूस शोभा, हिरवळ नव जीवनी।।

। जरूर भेट द्या...www.academicearth.com (नावाजलेल्या विद्यापीठांमधील क्रमिक अभ्यासक्रम व त्याचे व्हिडीओ)।

प्रायोजक - श्री. संजीव प्रभाकर करंदीकर, ठाणे

माणसातला देव

– सुनील शिनखेडे

शाळा सुटल्यावर घरी आलं, हातपाय स्वच्छ धुवून थोडी पोटपूजा झाली की संकेतला हुश्शार वाटायचं. म्हणजे ताजंतवानं. मग तो लगेच खेळायला बाहेर पडायचा. त्याच्या घराजवळ मोठं पटांगण होतं. तिथं सारे मित्र जमायचे. तास दीड तास वेगवेगळया देशी खेळांचा डाव रंगायचा. श्वास फुलायचा, घाम जिरायचा, अंग मोकळं व्हायचं, शरीराला तरतरी यायची. गप्पागोष्टीही व्हायच्या. एकमेकांशी वेगवेगळ्या विषयांवर बोलल्यानं खूप नवी माहिती मिळायची. पटांगणावरचा हा रोजचा मु तछंद संकेत अजिबात चुकवायचा नाही. खेळणं झालं, की पटांगणाच्या एका टोकाला असलेल्या दत्तमंदिरात दर्शन घेऊन मग घरी परतायचं. असा क्रम अगदी ठरलेला.

मंदिर जुनं होतं. काहीसं जीर्ण झालेलं; पण दत्तमूर्ती सतेज आणि प्रसन्न. मंदिरात शिरलं की हार-फुलांचा, तेलातुपाचा, वातीच्या दिव्यांचा, ओलसर भिंतींचा असा संमिश्र गंध यायचा. ओळखीचा. जुना. प्रदक्षिणेच्या चिमुकल्या वाटेवर संकेतच्या मनात नीरव शांतता दाटायची. डोळे आपसूक मिटायचे. गाभाऱ्यासमोर बसलेल्या महाराजांच्या हातून घेतलेला तीर्थप्रसाद प्राशन केला, की मैदानावरची रग सायीच्या दुधात साखर विरघळावी तित या सहजपणे नाहीशी व्हायची. चैतन्याचा गोडवा मात्र, मनाला हलकेच तरंगत ठेवायचा. मग तसंच तरंगत तरंगत घरी यायचं.

हे दत्तमंदिर हरदास महाराजांच्या वाडवडिलांपासूनचं. मंदिराला छोटंसंच, पण आवार होतं. गाभारा, सभामंडप आणि ओवऱ्या होत्या. समोर तुळशीवृंदावन. मंदिराच्या मागचा एकाकार झालेला वड-पिंपळ आणि औदुंबराचा हिरवा विस्तार मंदिराच्या कळसावर मायेचं छत्र धरून असल्यासारखा. मंदिरात वर्षभर निरनिराळे उत्सव सुरू राहत. साधक, भ त ओवरीत मु काम ठोकत. महाराजांचं घर मंदिराच्या मागं दोन खोल्यात संपणारं. मंदिरात साधक, भ त आणि सेवेकऱ्यांचा सतत राबता.

महाराजांचा मुलगा देवेंद्र हा संकेतच्या वर्गात होता. वर्गातले सगळेच काही मित्र नसतात, तसा देवेंद्र संकेतच्या वर्गात होता एवढंच. पण संकेत देवेंद्रला व्यवस्थित ओळखत होता. घरचे आणि जवळचे लाडाने देवेंद्रला देवा म्हणत. तो एकुलता एक असल्यानं लाडावलेला होता. घरीच देऊळ असल्यानं आपण देवाच्या खूप जवळचे असं त्याला वाटायचं. त्यात नावही देवा. आठवीत म्हणजे तसा अगदीच लहान नव्हता तो; पण त्याच्या अंगी वेगळंच मोठेपण होतं. तो खेळायला पटांगणात कधीच जायचा नाही. मोठ्या माणसांशी तो त्यांच्या बरोबरीचा असल्यासारखा बोलायचा. वचितच सर्वांसोबत आरतीला असायचा. आरती झाली, की आरतीच्या तबकातले दक्षिणेचे पैसे घेऊन शेजारच्या दुकानातून आवडती चॉकलेटस् घेऊन खायची त्याला वाईट सवय होती. तो कुणाच्याच पाया पडायचा नाही, की मंदिरातलं कुठलंच कामही करायचा नाही. संकेतचं त्याच्यावर अगदी बारीक लक्ष असायचं.

देवेंद्रला पटांगणात न्यावं आणि गदागदा हलवावं असं संकेतला खूपदा वाटायचं. तसं केल्यानं देवेंद्र आपल्याशी आणि इतर मित्रांशी बरोबरीनं वागेल असा त्याचा भाबडा समज. त्याने सामान्य मुलांसारखं वागावं असं संकेतला वाटायचं हे मात्र खरं. देवेंद्रकडे लक्ष द्यायला घरात कुणालाच वेळ नव्हता. हे खूपच स्वाभाविक होतं कारण त्याचे आईबाबा मंदिरातली

श्रमातुनी जो घाम निथळतो, तोच देव हे विसरू नको। भ्रष्ट पुढाऱ्यांपुढे कधीही, हात आपुले पसरू नको।।

। जरूर भेट द्या...www.baljagat.com (शालेय शिक्षणातले केले गेलेले वेगवेगळे प्रयोग)।

प्रायोजक - श्री. सुरेंद्र कापसे, प्रिस्टन, अमेरिका

रोजची पूजाअर्चा, उत्सव, कर्मकांड, भ तपरिवार यात बुडून गेलेले असत. घरातलं वातावरण आणि परिस्थितीमुळे देवेंद्र काहीसा एककल्ली झाला होता.

शाळेतही तो तासांना हजेरी लावून जाण्यापुरताच रमायचा. अभ्यासात मात्र हुशार होता. संकेतला त्याच्यातला एकच गुण आवडायचा, तो म्हणजे प्रामाणिकपणा. लपवाछपवी, खोटेपणा त्याच्या स्वभावात अजिबात नव्हता. 'मी आहे हा असा आहे' असा भाव त्याच्या वागण्याबोलण्यात असे.

दरवर्षी शाळेची सहल जवळपास अशा ठिकाणी जायची की मुलांना तिथं नवं अनुभवायला मिळेल. संकेत दरवर्षी न चुकता सहलीला जायचा. आपला चंद्रपूर जिल्हा आणि लगतचा भंडारा जिल्हा त्याला खूप आवडायचा. हिरवं जंगल, वनराई आणि तुडुंब तलावाचं वरदान या जिल्ह्यांना लाभलेलं. संकेतनं सहलीच्या निमित्ताने आतापर्यंत नवेगाव बांध, इटिया डोह, नागझिरा, अडयाळटेकडी, घोडेझरी अशी ठिकाणं बघितली होती. शाळेत नव्यानं रूजू झालेले देशमुख सर खूप उत्साही होते. त्यांनी ठरवलं होतं, की मुलांना आनंदवनलाच न्यायचं. संकेतनं आनंदवनबद्दल वाचलं होतं, ऐकलं होतं. तिथं जायला मिळणार म्हणून त्याला खूप आनंद झाला. आनंदवनाबद्दल देशमुख सर भरभरून सांगत होते..., ''आनंदवन म्हणजे श्रमदान, आत्मविश्वास यांचं जणू विद्यापीठ. बाबा आमटेंनी कुष्ठरुग्णांमध्ये जिद्द पेरली, त्यामुळं झडलेल्या बोटांतून, हातांतूनही हे आनंदवन फुललं. बाबांच्या कार्यानं आपण थ क होतो. प्रत्यक्षात देव आहे की नाही माहीत नाही, पण बाबांनी माणसांत देव पाहिला...'' देशमुख सरांचं बोलणं ऐकत राहावं असं. त्यांनी बाबा आमटे, विनोबा भावे, शिवाजीराव पटवर्धन, तुकडोजी महाराज यांना प्रत्यक्ष पाहिलेलं, ऐकलेलं होतं. संकेतची उत्सुकता यामुळं अधिकच वाढली. त्यानं मनाशी काही निश्चय केला.

संकेतनं देवेंद्रला या सहलीला न्यायचंच असं ठरवलं. तसं संकेतनं देवेंद्रला सांगितलं. 'घरचे नाही म्हणतील', असं देवेंद्र म्हणाला. संकेत म्हणाला, 'मी तुझ्या आईबाबांशी बोलतो.' एकदा संध्याकाळी नेहमीप्रमाणे खेळून देवदर्शनाला आल्यावर संकेत महाराजांशी बोलला,

''आम्ही ज्याला भेटायला जाणार आहोत तो देवमाणूस आहे.'' असं संकेत म्हणाला. महाराजांनी संकेतच्या डोळ्यात पाहिलं. त्यातला सच्चेपणा, भारावलेपणा त्यांना जाणवला. देवेंद्रला त्यांनी परवानगी दिली. संकेतला खूप आनंद झाला. 'मी देवेंद्रला सोबत करेन,' असं सांगून संकेत निघाला.

ठरल्याप्रमाणे सहल आनंदवनात पोहोचली. परिसर बघून मुलं बागडायला लागली. देशमुख सरांनी मग सर्वांना एकत्र करून माहिती दिली आणि आनंदवनच्या नियोजनानुसार प्रकल्प बघायला सुरुवात झाली. धडधाकट लोकांनाही जमणार नाही असं काम तिथे उभं केलेलं होतं. फुलं, फळं, शेती, सृजनाचे, निर्मितीचे लोभस रंग फुलले होते. कुष्ठरुग्ण शेतीत खपत होते. कुठल्या दालनात चादर, सतरंजी विणण्याचं काम, तर कुठं शुभेच्छापत्रांचे स्वागतोत्सुक दालन. टाकाऊतून टिकाऊ वस्तू तयार करण्याचंही काम वाखाणण्याजोगं. सर म्हणाले, ''कळलं का यातून काय शिकायचं ते? समाजात कुणीही कमी महत्त्वाचं, निरूपयोगी नसतं. कुणालाही दूर न लोटता जवळ केलं तर चांगलं काम उभं करता येतं.''

आनंदवनातल्या एकेक गोष्टी खूप नावीन्यपूर्ण होत्या. ते एक छोटंसं आदर्श गावच जणू! तिथे दवाखाना आहे, शाळा, पोस्ट ऑफिस आहे, कॉलेज आहे. तिथे पाणी अजिबात वाया जात नाही. हातपाय तोंड धुवून पाणी पिऊन चूळ टाकली, तरी ते पाणी फुलझाडांना, शेतीला मिळेल अशी व्यवस्था आहे. सांडपाण्याचंही तसंच. शिवाय तलावही खोदलेत. खतांची निर्मितीही होते. अन्न हे पूर्णब्रह्म मानायचं. ताटात काहीच टाकायचं नाही हा तिथला दंडक. पिकलेल्या सर्व वस्तू जेवणात होत्या. एक ताई म्हणाल्या, फ त मीठ इथे होत नाही. बाकी सगळं इथलंच!

ताठ मान हे भाग्य समज तू, लाचारी कधि शिकू नको। न्यायासाठी लढणारा हो, इमान अपुले विकू नको।

। जरूर भेट द्या...www.johnkyrk.com (जीवशास्त्रामधील उपशाखांचे ॲनिमेशन)।

प्रायोजक - श्री. अतुल कुलकर्णी, पुणे

देवेंद्र एरवी शांत असे, पण हे सगळं बघून तो भारावला. त्यानं खूप प्रश्न विचारले, जाणून घेतलं. देशमुख सर त्याला म्हणाले, ''देवेंद्र, तुझ्या देवळात जसा देव आहे ना, तसा इथला कुष्ठरोगी, सामान्य कष्टकरी हाच बाबांचा देव.'' माणसात देव पाहणाऱ्या देवमाणसाच्या दर्शनानं सहलीची सांगता झाली. बाबांचं बोलणं मनाचा ठाव घेणारं. त्या प्रभावातच सारे परतले.

सहलीचा अंमल खूप दिवस राहिला. देवेंद्रवर जणू बाबांनी गारूड केलं होतं. त्याच्यात खूप चांगला बदल घडला. तो खेळायला पटांगणावर यायला लागला. बोलायला लागला. मंदिरात येणाऱ्या आ ी, आजोबांना मदतीचा हात पुढं करायला लागला. संकेतला हे सारं बघून आनंद झाला. दिवस सरत होते. दहावी, बारावीनंतर आपापल्या वाटांनी मुलं निघून गेली...

...आज तीस वर्षांनी संकेत त्या गावी परतला होता आणि पटांगणाजवळच्या मंदिरासमोर उभा राहून तो थ क होऊन बघत होता... मंदिराचा जीर्णोद्धार झाला होता. त्या नव्या बांधकामालगत दर्शनी भागात वरच्या मजल्यावरची अक्षरं त्याला खुणावत होती – 'श्री गुरूप्रसाद चॅरिटेबल ट्रस्ट'. डॉ टर झालेल्या देवेंद्रनं व्यवसाय न करता सेवेचं व्रत म्हणून डॉ टरी पेशा स्वीकारला होता. अस्थिरोगतज्ज्ञ आणि कुशल सर्जन म्हणून त्याची ख्याती होती. मोफत शिबिरं घेऊन तो समाजऋण फेडत होता. गावातल्या सामाजिक बांधिलकीच्या अनेक कामांत त्यानं स्वत ला गुंतवून घेतलं होतं. संकेत एका माध्यमसमूहाचा प्रमुख म्हणून या कामाची ओळख करून घ्यायला आला होता. देवेंद्रला भेटायला तो उत्सुक होताच; पण आधी त्यानं देवळात जाऊन दर्शन घेतलं. प्रदक्षिणा घालताना तोच ओला गंध त्याला जाणवला. वडपिंपळ औदुंबराचा कल्पवृक्ष कळसावर तसाच मायेची पाखर घालत होता. महाराज थकले होते, पण चेहऱ्यावर भ तीचं निर्भय तेज तसंच. म्हणाले, ''तू येणार असल्याचा शुभसंकेत मिळाला होता. देवेंद्रच्या या पालटाला तू निमित्त झालास बाबा.'' संकेतनं तीर्थप्रसाद घेऊन देवेंद्रचं केबिन गाठलं. तिथे माणसात देव पाहणारा संकेतची वाट पाहत होता.

●●●

– सुनील शिनखेडे

कार्यक्रम अधिकारी, आकाशवाणी,
जुना कुंभारी रस्ता, MIDC
सोलापूर 413006

पेंढा भरले वाघ ओळखी, त्यांच्यामागे भ्रमू नको। जमावात शेळ्यांच्या मिसळुन मार्ग आपुला क्रमू नको।।

। जरूर भेट द्या...www.periodicvideos.com (पिरियॉडिक टेबलमधील मुलद्रव्यांवरील छोटे व्हिडीओज्)।

प्रायोजक - श्री. विद्याधर जोगळेकर, पुणे

मुलांचे पान

दुर्गा

– कु. सई कामत

(दर सोमवारी शेवटच्या तासाला आमचा 'अभिव्यक्तीं'चा तास घेतला जातो. मी आणि माझ्या मैत्रिणीने 'अभिव्यक्ती लेखन' हा विषय निवडला होता. या तासाचा नियम किंवा घरचा अभ्यास एकच, दर आठवड्याला काहीतरी लिहायचे. त्याला आम्ही 'आठवड्याचं लेखन' म्हणायचो. असाच एका सोमवारचा शेवटचा तास- अभिव्यक्ती लेखनाचा तास सुरू होता.)

''आठवड्याचं लेखन पूर्ण झालं का? झालं नसेल तर कर. नाहीतर दुर्गा तुला कच्ची खाईल,'' वर्गातलं कुणीतरी असं म्हणालं आणि मला धडकीच भरली. कारण वर्गातल्या मुलींचं 'कच्चं खाणं' मला चांगलंच माहीत होतं. त्यात 'दुर्गा' सारखं जुनं नाव या शाळेत पहिल्यांदाच ऐकलं होतं. ही दुर्गा जर खरंच 'दुर्गा' असती तर माझी धडगत नव्हती. त्यात कळलं, की हे रसायन 'द ऽ हा ऽ वी ऽ त' आहे. म्हणजे आणखीनच गोंधळ. कारण ५ वी ते ९ वी चं सगळं ज्ञान कोळून कोळून प्यायल्यावर जे काही होतं ते म्हणजे इयत्ता १० वीतली स्थिती.

तासाला या दुर्गेचा प्रवेश एखाद्या नाटकातल्या पात्रासारखा झाला. 'आपला तास मोकळा आहे; पण आपण तो मोकळा जाऊ देणार नाही.' वाटलं होतं ही दुर्गा खरंच दुर्गा असेल. पण छे ! अगदी मध्यम उंचीची, सावळी आणि शिडशिडीत- फ त बोलायलाच दुर्गा. तिचे हे शब्द ऐकले आणि माझं आलेलं अवसानही गळलं. कारणही तसंच होतं. हे साधं वा य बोलताना दुर्गाने *'मी जन्मालाच का आले? हे जग तयारच का झालं? किंवा पृथ्वी अजून फुटली का नाही?'* असे काहीसे भाव चेहऱ्यावर आणले होते. 'माझं लिहून झालं नाही.' हे वा य पूर्ण होण्याआधीच तिने माझ्यासमोर भाषण द्यायला सुरुवात केली,

''हे बघ, असली कारणं 'मऽलाऽऽ' द्यायची नाहीत. 'सुचलं नाही म्हणून लिहिलं नाही!' असं काहीही नसतं. हातात पेन घेतलं की सगळं लिहिता येतं...'' इ. इ. ही होती माझी आणि दुर्गाची पहिली भेट. जेव्हा-जेव्हा ही दुर्गा मला दिसत होती तेव्हा-तेव्हा ती मला साक्षात 'दुर्गाच' वाटायची.

काही माणसं आपल्या उगीच लक्षात राहतात. विनाकारणच. त्यांच्यातलीच ही एक - दुर्गा. 'ण' चा 'न' आणि 'न' चा 'ण' करणारी ही सरळ साधी मुलगी. काही माणसं स्वत:च्या चेहऱ्यावर एक प्रकारचा भाव घेऊन जन्माला येतात. प्रत्येकाची एक वेगळीच तऱ्हा. कदाचित ही दुर्गा त्यांच्यामधलीच होती. चेहऱ्यावर सदैव 'मळलेल्या गणवेशाचे' भाव ठेवून जिकडे-तिकडे वावरायची. मळलेल्या गणवेशाचेच भाव का? तर नेहमी गणवेश घातलेले लोक काय करायचे हे ठरवूनच वावरतात. जास्तीत जास्त यंत्रमानवाप्रमाणे वागण्याचा ते प्रयत्न करतात. आणि गणवेश मळलेला असेल तर कधी एकदा हा काढून फेकून देते असं होणार. म्हणून 'मळलेला गणवेश' ही एकच पदवी मी दुर्गाला देऊ शकले. पण अशा या 'मळलेल्या गणवेशाला' एरीयलसारखा महागडा पण उच्चप्रतीचा स्पर्श- म्हणजे 'मनमोकळं हसणं' कधी होणार होता, हे माहीत नव्हतं. आम्ही फ त वाट बघत होतो. प्रयत्न करण्याच्या भानगडीत आम्ही कधी पडलोच नाही. तशी इच्छाही नव्हती.

आतापर्यंत मी आणि माझ्या मैत्रिणी 'दुर्गा' हे तिचे नाव पार विसरून गेलो होतो. त्याऐवजी 'मळलेला गणवेश' या नावाने त्याची जागा घेतली होती. तिच्यावर एक स्तोत्र पण आम्ही रचलं होतं- 'दुर्गा शांती स्तोत्र.'

आणि हे स्तोत्र ऐकल्यावर ती काय म्हणेल यावरच आमची हसून हसून पुरेवाट व्हायची.

एकदा मी आणि माझी मैत्रीण जिना उतरत होतो. तेवढ्यात मागून ओळखीचा 'मळलेल्या गणवेशाचा' आवाज आला.

शब्द मोजके, कृती प्रभावी। काळ सुमंगल, घडवील भावी॥

। जरूर भेट द्या...www.solarenergy.com (सौर ऊर्जेवर चालणारी उपकणे, त्यांचा इतिहास, उपयोग इ.बद्दल)।

श्री. शैलेंद्र केशव म्हसकर, पुणे, सेंट्रल पेन्शनवर मोफत सल्ला (सायंकाळी), पुरोहित, ज्ञान प्रबोधिनी ☎ २४४५१३१९

चेहऱ्यावरचे नेहमीचे भाव. वेडगळासारखं चालत आणि बाटली अखंड गोल गोल फिरवत दुर्गा बोलत होती.

''अगं ए ऽऽ, तुझं नाव काय गं? हां सई. तू तुझ्या मैत्रिणीला सांग की मला सोमवारी – तीन आठवड्यांचं लेखन वहीत हवंय. आणि जर नसेल तर मी तुम्हाला पाठीच्या खालच्या भागावर वाईट्ट चोपेन.'' वा य संपलं रे संपलं की लागलीच आम्ही धूम ठोकली. नंतर सतत हसण्याशिवाय आणि लिहिण्याशिवाय आमच्याकडे दुसरा कोणताच पर्याय नव्हता.

शेवटी एकदाची तिनं कितव्यातरी सोमवारी माझी वही वाचायला घेतली. तिला कदाचित मी लिहिलेलं आवडलं होतं.

''किती छान लिहितेस गं तू!! तुझ्याकडे बघून असं वाटत नाही,'' ती म्हणाली. तिचा चेहरा शेवटचं वा य बोलताना नेहमीच्या भावांपेक्षा काहीतरी वेगळं सांगत होता. कपाळावरच्या आठ्या काहीतरी वेगळंच सुचवत होत्या. दुर्गानं माझ्या लिखाणात नेमकेपणाने काही सूचना केल्या. माझ्या लेखनशैलीविषयी ती भरभरून बोलत होती. आवर्जून तिनं पुस्तकांचे काही संदर्भ मला सांगितले. त्याक्षणी मला वाटलं, की 'मळलेला गणवेश' आता गणवेश राहिला नाही, तर एक सुंदरसा ड्रेस झाला आहे. मला तिच्यातला गोडवा अचानक जाणवू लागला. का ते कळत नव्हतं. तिच्या वरकरणी 'अवतारा'वरून तिला मी 'लेबलं' चिकटवत गेले. त्याचं खरंतर वाईट वाटत होतं. मला तिच्याशी हे मोकळेपणाने बोलायचे होते. पण त्यानंतरचे काही दिवस दुर्गा शाळेत आली नव्हती. फारच चुकल्या-चुकल्यासारखं वाटत होतं. कारण वरून कडक वाटणारी दुर्गा आता मला जवळची वाटू लागली होती...

●●●

– कु. सई कामत (इ. ७ वी)
ज्ञान प्रबोधिनी प्रशाला,
सदाशिव पेठ, पुणे-३०

जमिनीची भूरूपे

जमिनीची भूरूपे असतात वेगवेगळी,
पर्वत, पठार, मैदान, बेट, खिंड आणि दरी ।।

पर्वत असतात उंच आणि सगळ्यांहून मोठे,
डोंगरांना मानतात ते आपल्याहून छोटे ।।

टेकडी म्हणते कशी, मी सर्वांची बहीण छोटी,
सर्व मला म्हणतात, खोडकर तू नकटी ।।

मी पठार आहे सपाट अन् विस्तृत,
सगळे मानतात मला एक 'जमिनीचे रूप' ।।

तुम्ही राहता माझ्यावर,
म्हणता चला खेळू मैदानावर,
तुम्ही पाहता नेहमीच मला, पसरलो मी दूरवर ।।

चहूकडे पाणीच पाणी आहे असे मी बेट,
माझ्यावरील शिंपल्यांना बाजारात आहे रेट ।।

इकडून पर्वत तिकडून पर्वत, मी खिंड मध्ये अडकले,
बाजीप्रभूंनी लढवून मला पावन बनवले ।।

पर्वतांची खळी म्हणतात मला दरी,
झाडी अन् झुडपांच्या सान्निध्यात मी वाढी ।।

जमिनीची भूरूपे आहोत आम्ही सहा,
नीट जपणूक करा आमुची, न की होईल वाहवा ।।

– कु. गौतमी सडेकर

प्रत्येक क्षण वेचुनि, यत्नात जा नित दंगुनि। घे जिद्दीने यश खेचुनि, होईल सार्थक जीवनी ।।

। जरूर शोधा... http://www.madehow.com (आपल्या आजूबाजूच्या वस्तू कशा बनतात? शिकूयात) ।

प्रायोजक - श्रीमती उमा परांजपे, पुणे

प्रतिसादी वाचकवीर व्हा... ११

हा अंक वाचा... प्रश्नांची उत्तरे लिहून पाठवा... आणि बक्षीस मिळवा...

दर महिन्याचा 'छात्र प्रबोधन'चा अंक तुम्ही आवडीने वाचत असालच. छात्र प्रबोधनच्या वासंतिक अंकापासून (चैत्र/एप्रिल) त्या-त्या अंकावर आधारित काही प्रश्न दर महिन्याच्या छात्र प्रबोधनच्या अंकात देत असतो. **या अंकातील प्रश्नांची उत्तरे दि. १५ एप्रिल २०१५ पर्यंत** 'छात्र प्रबोधन'कडे पाठवा. बक्षीस जिंकण्याची प्रत्येकाला संधी. या निमित्ताने तुम्ही प्रत्येक अंक बारकाईने वाचाल व अंकातील साहित्याचा अधिक आनंद मिळवाल, असा विश्वास आहे.

प्रश्नांची उत्तरे लिहा

१) 'घे भरारी आकाशी' या पिल्लाच्या कथेतून आजोबा अप्रत्यक्षपणे स्वानंदला काय सुचवू पाहात आहेत?

२) 'खिडकी' या कवितेतून निसर्गातील कोणती दृश्ये कवयित्रिला दिसतात?

३) तुमच्या आजूबाजूला राहणाऱ्या जिद्दीने नवं काही करू पाहणाऱ्या किमान एका व्य तीची माहिती मिळवा. तुम्हाला त्या व्य तीतील कोणता गुणविशेष भावला, हे दर्शवणारा एखादा प्रसंग ७-८ ओळीत लिहा.

४) टांझानियातील अभयारण्य भटकंतीत लेखिकेला कोणकोणते प्राणी व पक्षी दिसले?

५) व्यंगचित्रे काढण्यासाठी चित्रकाराकडे कोणते गुण असणे आवश्यक असते?

६) 'माणसातला देव' या ललित लेखात सहलीला जाऊन आल्यानंतर देवेंद्रमध्ये कोणते बदल दिसून आले?

सफर दिवाळी विशेषांकाची- २०१४ या छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकावर आधारित स्पर्धेची उत्तरे पाठवलेल्या खालील विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन !

नित्य दिवाळी अंक - चि. मदन चव्हाण, चि. नरेंद्र अनिल गोडगे, चि. आदिनाथ फोफसे, चि. कुलदिप किरण व ते, चि. माजिद अकिल मणियार, चि. वैभव पाबळे, चि. आकाश पंडोरे (सर्व इ. १० वी), कोकमठाण, जि. अहमदनगर

ग्रामीण दिवाळी अंक - चि. यशराज क्षीरसागर (इ.९ वी), संगमनेर, कु. ईशा पाटील (इ. ८ वी), शिराळा, जि. सांगली, कु. नम्रता खानापुरे (इ. ८ वी), महागाव, ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर, कु. प्रतिक्षा वाडकर (इ. ६ वी), रावडी, पो. चिखलगाव, चि. नरेंद्र गोडगे (इ. १० वी), कोकमठाण

वरील सर्व विद्यार्थ्यांना छात्र प्रबोधनची ६ महिन्यांची वर्गणी बक्षीस म्हणून सस्नेह देण्यात येत आहे.

पुणे, नगरवाचन मंदिरातर्फे छात्र प्रबोधनच्या सौर अग्रहायण शके १९३६/डिसेंबर २०१४ च्या अंकातील 'प्रतिसादी वाचकवीर व्हा' या प्रश्नावलीवर स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेला सुमारे २०० विद्यार्थ्यांनी प्रतिसाद दिला. छात्र प्रबोधन संपादक मंडळातील सदस्या श्रीमती नीलिमाताई करमरकर या स्पर्धेच्या परीक्षक होत्या.

खालील विद्यार्थ्यांना शालानिहाय प्रथम क्रमांक मिळाला. सर्वांचे **मन:पूर्वक अभिनंदन !**

चि. श्रेयस शेखर कुलकर्णी (इ. ९ वी), मा. स. गोळवलकर गुरुजी विद्यालय, पुणे

चि. संकेत नितीन जुवेकर (इ. ८ वी), अभिनव विद्यालय, पुणे

कु. पूजा रामभाऊ आखाडे (इ. ८ वी), यशवंतराव चव्हाण मा. विद्यालय

हे मासिक ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक, प्रकाशक व संपादक श्री. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० फाल्गुन, शके १९३६, १ मार्च २०१५ या दिवशी बालोद्यान प्रेस, नातूबाग, शुक्रवार पेठ, पुणे -२ येथे छापून, ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ, पुणे - ३० येथून प्रसिद्ध केले.

परीक्षागृहात...

'पेपर असावा तर असा...', 'बापरे ! पहिला प्रश्न वाचूनच घाम फुटलाय...' 'शशी ! काय बरं ते सूत्र..' 'फ त अर्धा तास ?', 'माझं काय होणार आहे कुणास ठाऊक...!', 'एवढं कसं नाही आठवत...', 'काय करावं हे तीन तास ?', केवढा सोप्पा पेपर. काय लिहू नि काय नको...'

....यापैकी तुमची अवस्था कोणती ?

सौर फाल्गुन, शके १९३६/मार्च २०१५ पंजीकृत नियतकालिक,ISSN 2279 - 0691 Chhatra Prabodhan
प्रकाशन दिनांक : सौर १० फाल्गुन, शके १९३६ /१ मार्च २०१५
पंजीकरण क्रमांक (RNINO.)MAHMAR/2000/5636 घोषणापत्र क्रमांक : (PHM/SR/201/VIII/2001)
टपालाने सवलतीच्या दरात पाठविण्याचा परवाना क्रमांक : PCW/050 /2015 - 2017,
Posted at S.P. Post Office, Pune - 30, on 1st of Every Month

सौर दिनदर्शिका
शके १९३६

मार्च २०१५		फाल्गुन चैत्र
र.	1	१०
सो.	2	११
मं.	3	१२
बु.	4	१३
गु.	5	१४
शु.	6	१५
श.	7	१६
र.	8	१७
सो.	9	१८
मं.	10	१९
बु.	11	२०
गु.	12	२१
शु.	13	२२
श.	14	२३
र.	15	२४
सो.	16	२५
मं.	17	२६
बु.	18	२७
गु.	19	२८
शु.	20	२९
श.	21	३०
र.	22	चै. १
सो.	23	२
मं.	24	३
बु.	25	४
गु.	26	५
शु.	27	६
श.	28	७
र.	29	८
सो.	30	९
मं.	31	१०

हा फोटो मी उन्हामध्ये काढला आहे. मला ह्या फोटोमधील रंग खूप आवडतात. फोटोमधून आपल्याला प्रखर उन्हाची जाणीव होते. हा फोटो मी तोरणा किल्ल्याच्यामागे जी गावे आहेत तेथे काढला आहे.

–योगेश बोकील, yogeshbokil@gmail.com

पत्त्यामध्ये चुका असल्यास अथवा पिन कोड क्रमांक नसल्यास कळवा.

संपर्क पत्ता :
छात्र प्रबोधन, ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ, पुणे 411030
☎ (०२०)२४२०७ १७४/१७९
www.chhatraprabodhan.org
ई-मेल : chhatraprabodhan@jnanaprabodhini.org

या अंकाची किंमत : ₹ २०/-
वार्षिक वर्गणी : ₹ २००/-

प्रिय पोस्टमन,

हा अंक तुम्ही आमच्या लाड या मुलामुलींपर्यंत पोहोचवून फार मोठं काम करता. मुलंमुली या मासिकाची फार आतुरतेने वाट पाहात असतात. मासिक वेळेवर मिळाले नाही अथवा मिळालेच नाही तर ती नाराज होतात, त्यांचा तुमच्यावरचा अन् आमच्यावरचाही विश्वास कमी होतो. असं झालेलं तुम्हालाही निश्चितच आवडणार नाही. हो ना !

तेव्हा हे मासिक खात्रीशीरपणे, विनाविलंब शेजारच्या (⟶) पत्त्यावर द्यावे ही आपुलकीच्या नात्याने विनंती,

तुमचा-संपादक, छात्र प्रबोधन.

प्रति -